सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२३३ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि. १४ ऑक्टोंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

# मुंबईतील एन्ट्री पाँईटवरील पाचही टोलनाक्यावर हलक्या वाहनांना आजपासून टोलमाफी

## २ नदीजोड प्रकल्पांना मंजुरीसह राज्य मंत्रिमंडळाने घेतले १९ मोठे निर्णय



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४मुंबई**

राज्यात विधानसभा निवडणुकीची घोषणा कुठल्याही क्षणी होऊ शकते, त्याआधी राज्य सरकारकडून सर्वसामान्यांना दिलासे देणारे महत्त्वाचे निर्णय मंत्रिमंडळात घेण्यात येत आहे. सोमवारी १४ ऑक्टोबरला झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मुंबईतील एन्ट्री पाँईटवरील पाचही टोलनाक्यावर हलक्या वाहनांना आजपासून टोलमाफी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यासोबतच राज्यातील दोन नदीजोड प्रकल्पांना मान्यता देण्यात आली आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह इथं राज्य मंत्रिमंडळाची बैठक घेण्यात आली. या बैठकीला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांच्यासह मंत्रिमंडळातील इतर सदस्य उपस्थित होते. राज्यात आचारसंहिता लागू होण्यापूर्वी राज्य सरकारकडून विविध घोषणा केल्या जात आहेत. आजच्या बैठकीत आगरी समाजासाठीही महामंडळाची घोषणा करण्यात आली. त्याशिवाय हायब्रीड स्कील विद्यापाठीसाठी महसूल विभागातून खिडकाळी येथे विनामूल्य जमीन देण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

### आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेतलेले महत्त्वाचे १९ निर्णय

१) मुंबईतल्या ५ प्रवेश मार्गांवरील पथकर (टोल) हलक्या वाहनांसाठी माफ. आज रात्री १२ वाजेपासून अंमलबजावणी. २) आगरी समाजासाठी महामंडळ ३) समाजकार्य महाविद्यालयांमधील अध्यापकांना करिअर डव्हान्समेंट स्किम ४) दमणगंगा एकदरे गोदावरी नदी जोड योजनेस मान्यता ५) आष्टी उपसा सिंचन योजनेस सुधारित मान्यता ६) वैजापूरच्या शनीदेवगाव बंधाऱ्यास प्रशासकीय मान्यता ७) राज्य शेती महामंडळाची जमीन एमआयडीसीला हस्तांतरित ८) पाचपाखाडी येथील जमीन ठाणे मनपास प्रशासकीय भवनासाठी ९) खिडकाळी येथील जमीन हायब्रिड स्किल विद्यापीठासाठी विनामूल्य १०) राज्यात प्रधानमंत्री आवास योजना (शहरी ) २.० राबविणार ११) पुणे मेट्रो रेल टप्पा-२ मधील रेल्वे मार्गिकांच्या कामांना मान्यता १२) किल्लारीच्या शेतकरी सहकारी कारखान्याचे कर्ज व्याजासह माफ १३) अडचणीतील सहकारी उपसा जलसिंचन योजनांचे थकीत कर्ज माफ १४) मिरजच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात इमर्जन्सी मेडिसिनची ३ पदे १५) खंड क्षमापित झालेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना जुनी पेन्शन योजना १६) मराठी भाषेविषयक जनजागृतीसाठी पंधरवडा १७) अण्णासाहेब जावळे मराठवाडा विकास मंडळ अभ्यासगट १८) 'उमेद'साठी अभ्यासगट १९) कौशल्य विद्यापीठास रतन टाटा यांचे नाव

# आज रात्री शनी आणि चंद्र एकमेकांच्या समीप येणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि. १४ अमरावती**

आज सोमवारी, दि. १४ ऑक्टोबरच्या रात्री चंद्र शनिला झाकणार आहे. जेव्हा एक ग्रहगोल दुसऱ्याला झाकतो तेव्हा त्या स्थितीला पिधान, असे म्हणतात, अशी माहिती खगोल अभ्यासकांनी दिली.



शनीचे हे पिधान संपूर्ण भारतातून दिसणार आहे. हे पिधान आपल्याला नुसत्या डोळ्यांनीही दिसू शकेल. लहान दुर्बीण असेल किंवा एखादी द्विनेत्री - बायनोक्यूलर असेल तर या पिधानाचे चांगले निरीक्षण करता येईल. खगोलीय दुर्बीण असेल तर शनिची कडी सुद्धा दिसतील. निरीक्षणास रात्री १.३० वाजल्यापासून सुरुवात करावी. चंद्राच्या पूर्वेला तुम्हाला शनि सहज ओळखता येईल.

शनि आणि चंद्र एकमेकांच्या जवळ येत आहेत. मग चंद्र हळूहळू शनिला आपल्या मागे झाकेल. त्या नंतर सुमारे तासाभरानंतर शनि परत एकदा चंद्राआडून बाहेर येताना दिसेल, असे अभ्यासकांनी सांगितले.१४ ऑक्टोबर रोजी रात्री चंद्र - शनिची पिधान युती होणार आहे. मात्र त्यासाठी आकाश निरभ्र असणे जरूरी आहे. शनि पूर्वेकडील बाजूने चंद्रबिंबाआड जाईल आणि दुसऱ्या बाजूने बाहेर पडेल. रात्री ११.३० नंतर ही खगोलीय घटनेचे निरीक्षण करता येईल. प्रथम साध्या डोळ्यांनी आणि शनि चंद्रबिंबाआड जाताना दुर्बीण किंवा द्विनेत्रीतून पाहावे, अशी माहिती दा. कृ. सोमण, खगोल अभ्यासक यांनी दिली.

# महायुतीच्या घोषणांना काँग्रेस जोरदार उत्तर देणार

## महाराष्ट्रासाठी जाहीरनाम्यात ३ मोठी आश्वासने असणार?

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४मुंबई**

महाराष्ट्र विधानसभा निवडणूक आचारसंहिता लागण्यासाठी अवघे काही दिवस बाकी असल्याने जनमत आपल्या बाजूने वळवण्याचा प्रयत्न सर्वच राजकीय पक्षांकडून सुरू आहे. सत्ताधारी महायुतीने शेवटच्या टप्प्यात लोकप्रिय निर्णयांचा धडाका लावलेला असताना आता काँग्रेसकडूनही निवडणूक जाहीरनाम्यातून जोरदार प्रत्युत्तर दिलं जाण्याची शक्यता आहे. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसकडून जाहीरनामा बनवण्याचं काम सुरू असून या जाहीरनाम्यात सर्वसामान्य जनतेला भुरळ घालणाऱ्या घोषणा केल्या जाण्याची शक्यता आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, काँग्रेसच्या जाहीरनाम्यातून महायुती सरकारच्या लाडकी बहीण योजनेला उत्तर देण्यासाठी महिलांसाठी महालक्ष्मी योजनेची घोषणा केली जाऊ शकते. या योजनेच्या माध्यमातून महिलांना दरमहा २ हजार रुपये देण्याचं आश्वासन देण्यात येईल. तसंच तरुणांना आपल्याकडे खेचण्यासाठी बेरोजगार भत्ता देण्याची घोषणाही काँग्रेसकडून होऊ शकते. या योजनेतून बेरोजगार तरुणांना प्रतिमहिना ४ हजार रुपये देण्याचं आश्वासन काँग्रेसकडून दिलं जाऊ शकतं.

**शेतकऱ्यांनाही दिलं जाऊ शकतं मोठं आश्वासन**

मागील काही महिन्यांपासून राज्यात शेतकरी कर्जमाफीची मागणी जोर धरू लागली आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना खूश करण्यासाठी काँग्रेसकडून कृषी समृद्धी योजना आणली जाऊ शकते. या योजनेतून शेतकऱ्यांचे ३ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज माफ करण्याचा निर्णय घेण्याचं आश्वासन काँग्रेसकडून देण्यात येणार असल्याची माहिती आहे.

**काँग्रेसच्या बैठकांचा धडाका**

राज्यातील काँग्रेस नेते आज तातडीने राजधानी दिल्लीला रवाना झाले आहेत. विधानसभा निवडणुकीसाठी राज्यात कोणत्याही क्षणी आचारसंहिता लागू होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी राज्यातील नेत्यांची दिल्लीत बैठक बोलवली आहे. या बैठकीत निवडणूक तयारीसह जाहीरनाम्याबद्दल चर्चा होत असल्याचे समजते. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधिमंडळ पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात, विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार आणि मुंबई काँग्रेस अध्यक्ष खासदार वर्षा गायकवाड हे नेते या बैठकीला उपस्थित आहेत.

# दिवाळीतील हंगामी भाडेवाढ रद्द, एसटी महामंडळाचा मोठा निर्णय, प्रवाशांना दिलासा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४मुंबई**

दिवाळीतील प्रवाशांची गर्दी लक्षात घेता एसटी महामंडळाकडून करण्यात आलेली १० टक्के हंगामी भाडेवाढ रद्द करण्यात आली आहे. दिवाळीनिमित्त एसटी महामंडळाकडून दरवर्षी १० टक्के हंगामी भाडेवाढ करण्याचा निर्णय घेतला जातो. यंदा देखील २५ ऑक्टोबर ते २४ नोव्हेंबर दरम्यान तब्बल एका महिन्यासाठी ही भाडेवाढ लागू करण्यात आली होती. मात्र, प्रवाशांना दिलासा देत एसटी महामंडळानं भाडेवाढ रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाचा राज्याभरात एसटीनं प्रवास करणाऱ्यांना फायदा होणार आहे.




हंगामी भाडेवाढीचा निर्णय रद्द करण्यात आल्यानं महामंडळाच्या तिजोरीत जमा होणारी अतिरिक्त रक्कम मिळणार नाही. भाडेवाढीमुळे राज्यातील नागरिकांचा एसटीचा लांब पल्याचा प्रवास महागणार होता. आता मात्र त्यांना या निर्णयाचा फायदा मिळणार आहे.

दिवाळीच्या सुट्यांमध्ये अनेक कुटुंबे गावी, पर्यटनस्थळांना भेटी देण्याचे बेत आखतात. दिवाळीला जोडून आलेल्या सुट्ट्यांमुळे होणारी गर्दी लक्षात घेऊन महामंडळ दरवर्षी जादा गाड्यांची घोषणा करते. दिवाळी आणि उन्हाळी हंगामातील गर्दीतून उत्पन्न वाढीसाठी महामंडळ दरवर्षी हंगामी भाडेवाढ करत असते. महामंडळाच्या धोरणानुसार गर्दीच्या हंगामात भाडेवाढ करण्याचा अधिकार राज्य परिवहन गर्दीतून उत्पन्न वाढीसाठी महामंडळ दरवर्षी हंगामी भाडेवाढ केली जात असते, त्या प्रमाणं या वर्षी देखील निर्णय घेण्यात आला होता. आता तो निर्णय रद्द करण्यात आला आहे.

यंदा देखील २५ ऑक्टोबर ते २४ नोव्हेंबर दरम्यान १० टक्के हंगामी भाडेवाढ करण्यासंदर्भातील परिपत्रक जारी करण्यात आलं होतं. एसटीची प्रस्तावित १० टक्के भाडेवाढ विठाई, शिवशाही, निमआराम बसेससाठी लागू होती. मात्र, ती भाडेवाढ रद्द करण्यात आली आहे. मुंबई ते पुणे मार्गावर शिवनेरीकरीता भाडेवाढ लागू करण्यात आलेली नव्हती.सध्या दिवसाला सुमारे २३ ते २४ कोटी रुपयांचे प्रवासी उत्पन्न महामंडळाला मिळते. हंगामी भाडेवाढीमुळे दिवसाचे उत्पत्र ६ कोटी रुपयांनी वाढण्याची शक्यता होती. त्यामुळे महिन्याभरात महामंडळाला ९५० ते एक हजार कोटी रुपयांचा महसूल मिळण्याची अपेक्षा होती. मात्र, सध्या घेण्यात आलेल्या सध्या महिन्याला ८५० कोटी रुपये महामंडळाला उत्पन्न मिळते.

**प्रवाशांना मोठा दिलासा**

दिवाळीमधील सणांच्या काळात सर्वसामान्य प्रवासी एसटीला प्राधान्य देत असतात. १० टक्के हंगामी भाडेवाढ केल्यानं प्रवाशांना आर्थिक फटका सहन करावा लागतो. मात्र, यंदा एसटीच्या निर्णयामुळं प्रवाशांना दिलासा मिळणार आहे.



# विधानसभेसाठी शिवसेनेचा पहिला उमेदवार जाहीर आशिष जयस्वाल यांना उमेदवारी जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४नागपूर**

विधानसभेसाठी सर्वच राजकीय पक्ष तयारीला लागले आहेत. यातच विधानसभेसाठी शिवसेनेचा पहिला उमेदवार जाहीर करण्यात आलं आहे. आशिष जयस्वाल यांना शिवसेनेकडून उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.पारशीवनी येथील कार्यक्रमात आशिष जयस्वाल यांनी शिवसेनेत पक्षप्रवेश केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश झाला.पक्षप्रवेश झाल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत रामटेक विधानसभा मतदारसंघातून आशिष जयस्वाल यांची उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. आशिष जयस्वाल रामटेकमधून निवडणूक लढवणार आहेत.

# 'लाडक्या शेतकऱ्या'ला ४०३ कोटींची शासकीय मदत मिळणार तरी केव्हा?

## पश्चिम विदर्भाची स्थिती : ऑगस्ट महिन्यात सततचा पाऊस

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४ अमरावती**

पश्चिम विदर्भात यावर्षी जुलै ते सप्टेंबरदरम्यान सततचा पाऊस, अतिवृष्टी यामुळे खरीप पिके, फळपिकांचे मोठे नुकसान झाले. शिवाय घरांची पडझडही झालेली आहे. यासाठी चार प्रस्तावांद्वारे विभागीय आयुक्तांनी ४०२.९३ कोटींची मागणी शासनाकडे केलेली आहे. अद्याप शासन अनुदान अप्राप्त आहे. आता कोणत्याही क्षणी विधानसभेची आचारसंहिता लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे लाडका शेतकरी शासन मदतीपासून वंचित राहण्याची शक्यता आहे.

अमरावती विभागात यंदा पावसाची सरासरी पार झालेली आहे. यादरम्यान जुलै महिन्यापासून ५३ तालुक्यातील २४९ महसूल मंडळात अतिवृष्टी झालेली आहे. त्यामुळे नदी-नाल्यांना पूर येऊन पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. शिवाय शेतात पाणी साचल्यानेही काही भागांत पिके पिवळी पडली, सडली आहे. पुरामुळे शेतात गाळ साचला, शिवाय या आपत्तीमध्ये



चार हजारांवर घरांची पडझड झालेली आहे. जिल्हाधिकारी यांच्या आदेशान्वये बाधित पिकांचे सर्वेक्षण करण्यात आले व शासनाकडे अनुदान मागणीचे चार प्रस्ताव विभागीय आयुक्तांनी शासनाला पाठविले आहेत. ऑगस्ट महिन्यापासून जिल्ह्यातील बाधित पिकांसाठी व घरांची पडझड, दुकानांचे नुकसान यासाठी ४०३ कोटींची मागणी प्रशासनाद्वारा केली असताना शासनाद्वारा अनुदान मंजूर करण्यात आलेले नाही. त्यामुळे शेतकरी या अनुदानाच्या प्रतीक्षेत आहेत.

**...अशी आहे प्रस्तावांद्वारे अनुदानाची मागणी (लाखात)**

जानेवारी ते मेदरम्यान आपत्तीमुळे घरांची पडझड - १०४०.३८

जून ते जुलैदरम्यान खरडून गेलेली जमीन - ४३४.३३

आपत्तीमध्ये यवतमाळ जिल्ह्यातील दुकानांचे नुकसान - १९२.६६

ऑगस्ट महिन्यात शेती व फळपिकांचे नुकसान - ३८,६२३.४८

# उद्धव ठाकरेंवर 'अँजिओप्लास्टी'; ब्लॉकेज आढळल्यानं लगेचच शस्त्रक्रिया, डॉक्टरांचा विश्रांतीचा सल्ला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४ मुंबई**

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे सोमवारी नियमित तपासणीसाठी मुंबईतील एच.एन रिलायन्स रुग्णालयात चेकअपसाठी गेले आहेत. सकाळपासून उद्धव ठाकरे रुग्णालयात आहेत. काही वर्षांपूर्वी ठाकरेंची अँजिओप्लास्टी झाली होती. अलीकडे त्यांना पुन्हा त्रास झाल्याची माहिती आहे.



उद्धव ठाकरे हे आरोग्य तपासणीसाठी एच.एन रिलायन्स रुग्णालयात गेले, ठाकरेंच्या हृदयाच्या धमन्यांमधील ब्लॉकेज तपासण्यासाठी चाचण्या केल्या. या रिपोर्टमध्ये ब्लॉकेज आढळल्याने उद्धव ठाकरेंवर पुन्हा एकदा अँजिओप्लास्टी करण्यात आली आहे. सकाळी ८ वाजता उद्धव ठाकरे रुग्णालयात उपचारासाठी दाखल झाले होते. याआधी २०१२ साली ठाकरेंवर लिलावती रुग्णालयात शस्त्रक्रिया करण्यात आली होती.

## संपादकीय ......

# जो जे वांच्छील...

सध्याचे महाराष्ट्रातील सरकार नुसते गतिमान नसून अतिगतिमान झालेले आहे, असे लक्षात येत आहे. शासनाने ज्याला जे पाहिजे ते देण्याचा सपाटा लावलेला आहे. बेरोजगार युवकांना प्रशिक्षण भत्ता, लाडक्या बहिणींना दीड हजार रुपये, भाविक मंडळींसाठी तीर्थक्षेत्र योजना, बहुतांश लोकांना एसटीचा प्रवास मोफत, ज्या जातीला जे पाहिजे ते महामंडळ असा अद्भुत झपाट्याचा कारभार मुख्यमंत्री शिंदे करत आहेत. अगदी वृत्तपत्र विक्रेत्यांचेसुद्धा कल्याण करण्याचा प्रयत्न शासनाने केलेला आहे. थोडक्यात म्हणजे, ज्याला जे पाहिजे ते देण्याचा प्रयत्न केला आहे. संत ज्ञानेश्वरांनी म्हटल्याप्रमाणे 'जो जें वांच्छील तो तें लाहो' म्हणजेच ज्याला जे पाहिजे ते मिळू दे, अशी परमेश्वरापाशी केलेली प्रार्थना आहे.

सर्वांसाठी बरेच काही केले असले, तरी अजून बरेच काही करायचे बाकी आहे, हे आम्ही शासनाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. स्वतःचे पाय लडखडत असतील, तरी शासनाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असणारे राज्यातील मद्यप्रेमी बांधव अद्याप उपेक्षितच आहेत. हे बांधव स्वतःच्या प्रकृतीचा विनाश झाला, तरी बेहत्तर; परंतु अर्थव्यवस्था उभी राहिली पाहिजे हे ध्येय घेऊन दररोज स्वतः आडवे होत असतात. असे म्हणतात की निषिद्ध द्रव प्राशन करणार्या या लोकांनी हे द्रव प्राशन करणे थांबवले, तर शासन आपल्या कर्मचार्यांचा पगारसुद्धा करू शकणार नाही. इतकी अटीतटीची भूमिका अर्थकारणात बजावणार्या मंडळींसाठी शासनाने अद्याप काहीही केले नाही, याची नोंद कुठेतरी घेतली गेली पाहिजे. या लोकांच्या आपल्या वेगळ्या समस्या असतात. खूप वाढलेली महागाई किंवा या द्रवाचे मूल्य कमी करा, अशी कोणतीही मागणी करण्यासाठी या लोकांनी कधीही मोर्चा काढलेला नाही. या लोकांनी कधीही कोणते महामंडळ मागितलेले आहे. कोणतेही आंदोलन न करता शांतपणे देशाची सेवा करणार्या या मंडळींकडे कुणी लक्ष देणार आहे की नाही?

या लोकांच्या मागण्या फारशा नसाव्यात, असे वाटते. शांतपणाने 'घेऊ द्या' एवढी एकच त्यांची मागणी असावी. मनातील चलबिचल कमी करण्यासाठी किंवा मनात निर्माण झालेल्या नकारात्मक भावनांवर मात करण्यासाठी हे लोक ते द्रव घेत असतात. त्यांची स्वतःची पैशाची एक मॅनेजमेंट असते. त्यांना फक्त काय हवे असेल, तर ते म्हणजे बकेटभर पाणी आणि थोडासा आडोसा. एवढे मिळाले की, काही क्षणांत ही मंडळी समाधी अवस्थेत जाऊन पोहोचतात. बहुतांश लोक निमूट आपापल्या घरी जाऊन झोपी जातात. या लोकांना त्यांच्या स्वतःच्या घरी सोडण्यासाठी काही एक निश्चित अशी व्यवस्था शासनाने निर्माण केली पाहिजे. जास्त घेतली की, बरेचदा आपल्या स्वतःच्या घराचा पत्ता त्याना सापडत नाही आणि मग गोंधळलेला हा अर्थव्यवस्थेचा कणा गल्ली-बोळात भटकायला लागतो. अशा लोकांना त्यांच्या घरी सोडण्यासाठी शासनाने स्वतःच्या खर्चाने स्वयंसेवक नेमले पाहिजेत. या स्वयंसेवकांनी एखादा अतिसेवन झालेला व्यक्ती दिसला, तर त्याला नम्रपणे त्याच्या घरचा पत्ता विचारून त्याला त्याच्या घरी नेऊन सोडले पाहिजे. याचे दोन फायदे होतील. पहिला म्हणजे, ही रसिक मंडळी सुखरूप आपल्या स्वतःच्या घरी पोहोचतील आणि दुसरा म्हणजे यामुळे अनेक बेरोजगार युवकांना किमान संध्याकाळच्या वेळी तरी काही ना काही रोजगार मिळू शकेल. हे लोक प्रामाणिक असल्यामुळे सत्ताधारी पक्षाला मतदानही करतील, यात शंका नाही.

# भाजीपाला पिकांची लागवड करण्यापूर्वी कोणत्या गोष्टींचा अभ्यास कराल?

**दि.१४विदर्भ प्रजासत्ताक**

भाजीपाला लागवडीचे नियोजन करत असाल तर लागवड करता असताना लागवडीसाठी लागणारे काही महत्त्वाच्या घटक म्हणजे जमीन, पाणी, खते, सूर्यप्रकाश, औषधे, चांगल्या गुणवत्तेची रोपे/बियाणे इ. गोष्टींची उपलब्धता आहे का हे पाहूनच पुढे जावे.




**आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर**

- भाजीपाला लागवडीसाठी ठिबक सिंचन प्रणालीचा वापर केल्यास कमी पाण्यातही उत्पादन घेता येते. त्याचबरोबरच विद्राव्य खतांचा वापर प्रभावीपणे होतो.

विदर्भ प्रजासत्ताक **कृषी विशेष**

- बदलत्या तापमानामुळे उन्हाळ्यात भाजीपाला पिकवणे कठीण झाले आहे. म्हणून ५०% शेडनेटचा वापर करून तापमान नियंत्रण करता येते. त्यामुळे उन्हाळ्यातही पालेभाज्या व फळभाज्यांचे उत्पादन घेऊन चांगले उत्पन्न मिळवता येते.

- याशिवाय तापमान कमी करण्यासाठी तुषार सिंचन प्रणाली वापरणे फायदेशीर ठरते.

भाजीपाला लागवडी अगोदर कोणत्या गोष्टींचा अभ्यास करावा?

१) सध्याच्या बाजारपेठेतील मागणी पाहता, सेंद्रिय भाजीपाल्याला प्राधान्य दिले जात आहे. त्यामुळे आपण जास्तीत जास्त सेंद्रिय खते व निविष्ठांचा वापर करून भाजीपाला पिक वल्यास ग्राहकांची पसंती मिळेल आणि त्यातून चांगला नफा मिळू शकतो.

२) उन्हाळ्यात भाजीपाला लागवड केल्यास बाजारात चांगला दर मिळतो, मग ते पालेभाज्या असोत की फळभाज्या, वातावरणातील बदलामुळे भाजीपाला शेतीत अडचणी वाढल्या आहेत. आपण या अडचणींना संधी मानून उन्हाळ्यात भाजीपाला पिकवून चांगला नफा मिळवू शकतो.

३) मार्केटचा सखोल अभ्यास असणे महत्त्वाचे आहे. बरेच शेतकरी त्याचीच लागवड करतात, परंतु नंतर त्याच मालाची बाजारात भरपूर आवक झाल्यामुळे दर घसरतात. त्यामुळे बाजारपेठेचा अभ्यास करून योग्य पिकाची निवड करणे गरजेचे आहे.

**भाजीपाला लागवडीतील अडचणी**

भाजीपाला लागवडीमधील अडचणी पहिल्या तर इच्छाशक्तीचा अभाव, वातावरणातील बदल, मजुरांची कमी उपलब्धता, अतिवृष्टी, उच्च तापमान, जीवघेणी थंडी या नैसर्गिक अडचणी आहेत.

**भाजीपाला उत्पादकता कशी वाढवावी?**

जास्तीत जास्त सेंद्रिय खतांचा वापर, चांगल्या वाणाचे बियाणे वापरणे आवश्यक आहे. तसेच गुणवत्तापूर्ण रोपांची लागवड करणे, रोग व किड प्रतिबंधक उपाययोजना करणे, उपयुक्त जिवाणू व बुरशींचा वापर परसबागेत करणे आवश्यक असल्याचे ते सांगतात.

**कोणती पिके फायदेशीर ठरू शकतात?**

फायदेशीर पिकांचा विचार करता मेथी, पालक, कोथिंबीर, कोबी, बीटरूट, फ्लॉवर,मिरची, वांगी यांची वर्षभर चांगली मागणी असते.

**खर्च नियंत्रण करण्यासाठी उपाययोजना**

लागवड करत असताना खर्चावर नियंत्रण करणे अत्यंत आवश्यक असून त्यासाठी जास्तीत जास्त सेंद्रिय खतांचा वापर करणे, जैविक सेंद्रिय निविष्ठांचा वापर करणे, रोग व किड प्रतिबंधक उपाययोजना केल्यास पुढील खर्च टाळता येतो, तसेच नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब केल्यासही खर्चावर नियंत्रण येते.


**भाजीपाला पिकातील संधी**

२० गुंठ्यातही भाजीपाला लागवड शक्य आहे. त्याचप्रमाणे स्थानिक बाजारपेठेत भाजीपाल्याची विक्री करून चांगले उत्पन्न मिळवता येते. शिवाय विक्री दरम्यान शेतकरी ते ग्राहक थेट विक्रीची संकल्पना प्रत्यक्षात उतरवता येईल. ८-१० जणांचा गट करून उच्च प्रतिचा भाजीपाला इतर बाजारपेठेत विकू शकतो.

**- प्रविण ननावरे**
**भाजीपाला रोपवाटिका तज्ञ**

# महिला महाविद्यालय येथे जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त ताण व्यवस्थापन मार्गदर्शन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती** - स्थानिक नूतन विदर्भ शिक्षण मंडळ संचालित महिला महाविद्यालय कनिष्ठ विभाग येथे जागतिक मानसिक आरोग्य दिनाच्या पार्श्वभूमीवर आपुलकी प्रकल्पांतर्गत ताण व्यवस्थापन नियोजन कार्यक्रमाचे आयोजन दिनांक १० ऑक्टोबर २०२४ रोजी आयोजित करण्यात आले होते. तलवारीने झालेली जखम भरू शकते पण शब्दाने झालेली जखम भरू शकत नाही तेव्हा प्रत्येकाने शब्द जपून वापरावे तसेच अनावश्यक शब्दांनी येणाऱ्या ताणाचे व्यवस्थापन करावे जेणेकरून जीवन सुंदर



होईल. असे सकारात्मक विचार कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्राचार्य डॉ. अविनाश मोहरील यांनी व्यक्त केले. आपुलकी प्रकल्प प्रमुख प्रा. डॉ. अरुणा वाडेकर यांनी आपुलकी प्रकल्प तसेच कार्यक्रमाचे प्रयोजन प्रास्ताविकातून मांडले. याप्रसंगी डॉ. अविनाश मोहरील यांनी ताणाची लक्षणे तसेच त्यावरील उपाय योजना यांचे सखोल मार्गदर्शन केले. आजच्या धकाधकीच्या आणि धावपळी च्या जीवनात सगळ्यांना वेगवेगळ्या ताणाला सामोरे जावे लागते. आणि अशा वेळेस ताणाचे नीट व्यवस्थापन केले नाही तर ती एक गंभीर समस्या बनू शकते असा इशारा देखील यावेळी त्यांनी दिला. या करिता समस्या ओळखून त्यावरील उपाययोजना म्हणून पाच गोष्टी प्रत्येकाने आवर्जून केल्या पाहिजे. मेडिटेशन, एक्ससाइज, तसेच आपल्या भावना व्यक्त करणे, एखादा छंद जोपासणे आणि जीवनातल्या छोट्या छोट्या गोष्टीत आनंद शोधणे या साऱ्या गोष्टी करून आपण आलेल्या ताणाचे व्यवस्थापन सहजरीत्या करू शकतो असे त्यांनी सांगितले. याप्रसंगी नूतन विदर्भ शिक्षण मंडळ सहसचिव ममता पांडे, पर्यवेक्षिका प्रा.माधुरी सोनपरोते, प्रा.मंजिरी वळसे उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता प्रा. वर्षा साबळे, कांचन परतेकी त्यांनी विशेष परिश्रम घेतले. याप्रसंगी मोठ्या संख्येने विद्यार्थी तसेच प्राध्यापक वृंद उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन कु. जान्हवी शिंदे हीने केले. नूतन विदर्भ शिक्षण मंडळ कार्यकारणी यांनी या विशेष उपक्रमास शुभेच्छा दिल्या आहेत .

# अंजनगाव सुर्जीत ४० फूट उंच रावणाच्या प्रतिकृतीचे दहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अंजनगाव सुर्जी**

सत्याचा असत्यावर विजयाचे पर्व म्हणजे विजयादशमीचा सोहळा काठीपुरा येथे परंपरेनुसार ४० फुटाच्या रावणाच्या प्रतिकृतीचे दहन करून उत्साहात साजरा करण्यात आला.

दूसरा महोत्सव समिती व बलराम व्यायाम शाळेच्या माध्यमातून यंदाही रावण दहन आणि शस्त्र पूजनाच्या कार्यक्रमाला माजी आ. रमेश बुंदीले, माजी नगराध्यक्ष ॲड. कमलकांत लाडोळे, ठाणेदार प्रकाश अहिरे, देविदास वाळके, रामभाऊ टेकाम, ममता जैस्वाल, प्रियंका मालठाणे व इतरांची प्रमुख उपस्थिती होती. या वेळी चित्तथरारक प्रात्यक्षिकासह लहानमुला-मुलींनी लेझीम प्रात्यक्षिक सादर करून उपस्थितांची मने



जिंकली. त्यानंतर लोकपरंपरेनुसार अंजनगाव सुर्जी येथील नागरिकांनी रावणासह सिद्धेश्वर महादेवास सोने अर्पण करून श्री राम, लक्ष्मण, सीता या पात्रांच्या हस्ते रावणाच्या प्रतिकृतीचे दहन केल्यावर गावात सोने वाटण्याची सुरुवात केली. रावणाची प्रतिकृती निखिल स. चव्हाण यांनी तयार केली होती. नागरिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादा बद्दल रावण दहन तथा विजया दशमी महोत्सव तसेच रावण दहन समितीचे सचिन जायदे, अमोल पटेल, अवी देंगे, अनिल जवंजाळ, शंकर मालठाने, भूपेंद्र भेलांडे, सुनील चोपडे, ऋतिक बुंदीले, रफिक शहा यांनी आभार मानले.




## सामोसा-गुलाबजाम खाल्ले भरपूर तर तेवढ्या कॅलरी जाळायला तुम्हाला किती चालावं लागेल,

**दि.१४विदर्भ प्रजासत्ताक** - आपल्याला सगळ्यांनाच फास्टफूड, जंकफूड, तेलकट, मसालेदार आणि गोडाधोडाचे पदार्थ खायला खूप आवडतात. बरेचदा आपण सकाळच्या नाश्त्याला किंवा संध्याकाळच्या टी टाईमच्या वेळी असे पदार्थ खाणे पसंत करतो. या पदार्थांमध्ये सामोसा, पिझ्झा, बर्गर, पराठा, गुलाबजाम अशा अनेक चटपटीत पदार्थांचा समावेश असतो. या पदार्थांमध्ये फार मोठ्या प्रमाणांत कॅलरीज असतात. जेव्हा आपण असे पदार्थ वारंवार खातो तेव्हा आपल्या शरीरात फॅट्स आणि कॅलरीजचे प्रमाणात वाढते. या कॅलरीज बर्न करण्यासाठी आपण वेगवेगळ्या प्रकारचे एक्सरसाइज किंवा वॉकिंग करतो. परंतु असे पदार्थ खाल्ल्यानंतर कॅलरीज बर्न करण्यासाठी नेमकं किती वेळ चालाव हे आपल्याला माहित नसतं. असे कोणते पदार्थ खाल्ल्यावर आपल्याला त्यातून किती कॅलरीज मिळतात, आणि या कॅलरीजप्रमाणे त्या बर्न करण्यासाठी नक्की किती वेळ चालावं ते पाहूयात



सामोसा-गुलाबजाम खाल्ले भरपूर तर तेवढ्या कॅलरी जाळायला तुम्हाला किती चालावं लागेल, माहिती आहे?

१. सामोसा :-एका सामोशात २६२ कॅलरीज असतात. जर आपण एक सामोसा खाल्ला तर या कॅलरीज बर्न करण्यासाठी आपल्याला १ तास वॉकिंग करावे लागेल.

सामोसा-गुलाबजाम खाल्ले भरपूर तर तेवढ्या कॅलरी जाळायला तुम्हाला किती चालावं लागेल, माहिती आहे?

गुलाबजाम :-गोडधोड पदार्थांमध्ये गुलाबजाम हा सगळ्यांच्याच विशेष आवडीचा पदार्थ आहे. एका गुलाबजाममध्ये १७५ कॅलरीज असतात आणि त्या बर्न करण्यासाठी आपल्याला ४५ मिनिटे चालावे लागेल. गुलाबजाम समोर दिसले की आपण फक्त एकच गुलाबजाम खात नाही, त्यामुळे गुलाबजाम खाताना कॅलरीजचा नक्की विचार करा.

छोले - भटुरे :-मस्त मसालेदार, झणझणीत छोले - भटुरे म्हटलं की तोंडाला पाणी सुटत. साधारणतः एक प्लेट छोले - भटुरे खाल्ले असता आपल्याला ४२५ इतक्या कॅलरीज मिळतात. या इतक्या कॅलरीज बर्न करण्यासाठी आपल्याला १ तास ४५ मिनिटे चालावे लागेल.

आलू पराठा :-बटर न लावलेल्या एका आलू पराठ्यात जवळपास २४० इतक्या कॅलरीज असतात. इतक्या कॅलरीज बर्न करण्यासाठी आपल्याला ५५ मिनिटे वॉकिंग करावे लागेल.

१० इंचाच्या एका चीझ पिझ्झ्यात १००० कॅलरीज असतात. या इतक्या कॅलरीज बर्न करण्यासाठी आपल्याला दिवसभरत चक्क ४ तास चालावे लागेल.

# काँग्रेस पक्षाची सदैव आभारी राहील- आ.सौ. सुलभाताई खोडके

## येत्या दोन-तीन दिवसात आगामी भूमिका स्पष्ट करणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती** महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमेटीच्या वतीने माझ्यावर सहा वर्षासाठी पक्षातून निलंबित करण्यात आल्याची कार्यवाही करण्यात आली असल्याची माहिती मला वृत्तपत्रातील बातम्यांमधून मिळाली आहे. याबाबत शहराच्या राजकारणातही चर्चा होत असतांना मी माझी पहिली प्रतिक्रिया माध्यमांमधून व्यक्त करीत आहे.मी वर्ष २०१४ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीतून भारतीय राष्ट्रीय काँग्रेस मध्ये प्रवेश केला. माननीय सोनियाजी गांधी यांनी आपल्याला उमेदवारी दिली , पक्षाच्या तिकिटावर व पंजाच्या चिन्हावर २०१४ मध्ये बडनेरा विधानसभा मतदार संघातून निवडणूक लढविली होती, तसेच वर्ष २०१९ ला पुन्हा काँग्रेस पार्टीकडूनच अमरावती मतदार संघातून निवडणूक लढवीत विजयी झाले, प्रतिस्पर्धी उमेदवाराचा तब्बल २० हजार मतांनी पराभव केला. काँग्रेस पार्टीने दोनवेळा उमेदवारी दिल्या बद्दल माननीय सोनियाजी गांधी व इतर जेष्ठ नेत्यांचे आभार व्यक्त करते. गेल्या पाच वर्षांपासून मी काँग्रेस पक्षाचीच आमदार म्हणून कार्यरत आहे. कधीही काँग्रेस पक्षाची लोकशाही व धर्मनिरपेक्ष विचारधारा सोडलेली नाही.

काँग्रेस पक्षाने दोन वेळा उमेदवारी देऊन काम करण्याची संधी दिल्या बद्दल मी काँग्रेसच्या जेष्ठ नेत्या श्रीमती सोनियाजी गांधी, राष्ट्रीय अध्यक्ष



मल्लिकार्जुन खरगे व युवा नेते खा. राहुलजी गांधी तसेच इतर वरिष्ठ नेत्यांचे आभार व्यक्त करीत आहे.

माझी आगामी भूमिका मी येत्या दोन - तीन दिवसात जाहीर करणार आहे.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

सोमवार दि. १४ ऑक्टोबर २०२४ | शहर/ग्रामिण




## भारत हा भारता सारखा राहीला पाहिजे, यासाठी संघाचे कार्य अविरत सुरू -डॉ.मनमोहन वैद्य





### अमरावती महानगराचा विजयादशमी उत्सव थाटात

### स्वयंसेवकांनी शारीरिक प्रात्यक्षिके सादर करत उपस्थितांची मने जिंकली



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४अमरावती–** राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हिंदुत्वाला सर्वसंपन्न करण्यासाठी ९९ वर्षापासून निस्वार्थपणे अविरत कार्यरत आहे. अध्यात्माने सर्वांना एकासूत्रात जोडून ठेवले आहे. हिंदुत्व व आध्यात्म ही भारताची ओळख आहे, असे प्रतिपादनराष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अखिल भारतीय कार्यकारणीचे सदस्य डॉ. मनमोहन वैद्य यांनी केले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, अमरावती महानगराचा विजयादशमी उत्सव व शस्त्रपूजन कार्यक्रम रविवारी (ता.१३) सायंकाळी स्थानिक श्रीमती नरसम्मा महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजिण्यात आला होता. त्यावेळी ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून टोंगसे पाटील बिल्डकॉन सोल्युशन प्रा. लि.चे अध्यक्ष श्रीकृष्ण टोंगसे उपस्थित होते. विभाग संघचालक चंद्रशेखर भोंदू, महानगर संघचालक उल्हास बपोरीकर व्यासपीठावर होते.

डॉ. वैद्य म्हणाले, कोरोनाचा कठीण काळ आपण अनुभवला आहे. या काळात शासकीय कर्मचाऱ्यांसह सामान्य नागरिक देखील सेवाकार्यासाठी बाहेरपडले. जगात असे कुठेच घडले

नाही. पण, भारतात घडले हे आपले वैशिष्ट आहे. अध्यात्मच त्याचा आधार होता. अध्यात्मानेसर्वांना जोडून ठेवले आहे. सत्य, एकता, ईश्वरीत्व, उपासना हे त्याचे चार पैलू आहे. भारताचे राष्ट्र म्हणजे समाज आहे. येथे परकीयांचेआक्रमण झाले, त्यांनी राज्य केले पण, राष्ट्र नेहमी अपराजीत राहीले आहे. समाजाला जागृत करण्यासाठी अध्यात्माच्या आधारावर हिंदुत्वाचे चिंतन होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.प्रमुख अतिथी श्रीकृष्ण टोंगसे म्हणाले, भारत हा भारता सारखा राहीला पाहिजे, यासाठी संघाचे कार्य अविरत सुरू आहे. संघाच्या या कार्याला सर्वांनी बळ द्यावे. संघात सहभागी व्हावे.हिंदुत्वासाठी आपल्याला कार्य करायचे आहे. याशिवाय पुढची पिढी रोजगारभिमुख व्हावी, यासाठी पालकांनी प्रामाणिक प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी केले.

प्रमुख अतिथींचे स्वागत चंद्रशेखर भोंदू यांनी केले. प्रास्ताविक व परिचय महानगर संघचालक उल्हास बपोरीकर यांनी करून दिला. अमृतवचन रोनित पांडे, वैयक्तीक गीत निशांत फणसाळकर, प्रार्थना स्वराज ठाकरे यांनी सादर केली. उत्सवाचे मुख्य शिक्षक विवेक धर्माळे होते. मुख्य कार्यक्रमाच्या सुरुवातीला ध्वजारोहण व त्यानंतर अतिथीच्याहस्ते शस्त्रपूजन झाले. स्वयंसेवकांनी प्रदक्षिणा संचालन, दंड, नि:युद्ध, व्यायाम योग, योगासन, घोष सांघिक गित, शारीरिक प्रात्यक्षिके सादर करत उपस्थितांची मने जिंकली. तत्पूर्व संपूर्ण गणवेशात स्वयंसेवकांच पथसंचलन श्रीमती नरसमा महाविद्यालयाच्या प्रांगणात निघाले होते. मार्गात उपस्थित नागरिकांनी पुष्पवृष्टी स्वयंसेवकांचे स्वयंस्फूर्तीने स्वागत केले. उत्सवाला महानगरातील व मान्यवर मंडळी, संघ नागरिक, माता भगिनी मोठया संख्येने उपस्थित होत्या.

## केंद्र शासनाच्या युरिया खतामध्ये भेसळ करणाऱ्या तिघांना अटक

### १६ चक्का ट्रक व खतासह ३०.४६ लाखांचा मुद्देमाल जप्त

### शेतकऱ्यांना सबसिडीवर होतो खताचा पुरवठा



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४नांदगाव पेठ** गुन्हेशाखा युनिट १ च्या पथकाने दसऱ्याच्या दिवशी मध्यरात्री शेतशिवारात धाड टाकून केंद्रशासना तर्फे शेतकऱ्यांना सबसिडीवर मिळणाऱ्या युरिया खतामध्ये भेसळ करणाऱ्या तिघांना अटक केली. नांदगावपेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीत

येणाऱ्या वडगाव माहुरे शिवारात ही कारवाई करण्यात आली असून पोलिसांनी आरोपींच्या ताब्यातून १६ चक्काट्रक, असलीवनकलीखत, इतर

साहित्य असा एकूण तब्बल ३० लाख ४६ हजार ६०१ रूपयांचा ऐवज जप्त केला आहे.

वडगाव माहुरे शेत शिवारामध्येबत्रा यांच्या प्लॉटच्या आवारात रात्रीच्या वेळी काही इसम १६ चक्का ट्रकमधून खताचे पोते खाली उतरवून दूस–या पोत्यात ते भरतआहे, अशा माहितीवरून युनीट कं. ०१ चे अधिकारीव अंमलदार तेथे पोहोचले. घटनास्थळावर जावून पाहणी केली असता तिन इसम हे ट्रक कं. एमएच २७ बिक्यु ९७८६ व्या बाजूला उभे असून काही मजूर हे ट्रक मधून पिवळ्या कलरच्या खताचे पोते ज्यावर भारतीय जन उर्वरक परियोजना भारत युरीया असे लिहलेले खतांचे पोते उतरवून पांढ–याकलरच्या पोत्यात ज्यावर टेक्निकलग्रेडयुरिया फॉर इंडस्ट्रियलयुज ओन्ली, असेलिहलेल्यापोत्याततत्याचेवजन काटयावर वजन करून त्याला मशीनद्वारे रिसिल करताना दिसून आले. बिलाबाबतविचारणा केली असता कोणत्याही प्रकारचे बिल त्यांच्याकडे मिळाले नाही. दरम्यान याबाबत कृषी अधिका? यांना माहिती देण्यात आली. त्यानंतर गुन्हे शाखा युनिट वन व कृषी विभागाच्या अधिका? यांनी ट्रकची पाहणी केली. तेथील एमएच २७ बिक्यु ९७८६ या ट्रकमध्ये खताचे १८९ पोते दिसुन आले. तसेच खाली जमीनीवर ताडपत्रीवर ४३८ बॅगदिसून आल्या. पिवळ्या रंगाचे खताचे पोते ज्यावर भारतीय जन उर्वरक परियोजना भारत युरीया असे लिहलेले खतांचे पोत्यांची उघडुन पाहणी केली असता त्यामध्ये युरीया खत असल्याचे दिसुन आले. त्यामुळे तेथे उपस्थित असलेल्या तिघाना ताब्यात घेण्यात आले. त्यात संजय रमेशचंद्र अग्रवाल, वय ५४ वर्ष रा. पद्मावती चौक,पुलगाव रोड, आर्वी जिल्हा वर्धा), अशोक धनराज रावलानी, (वय ५४ वर्ष रा. कृष्णा नगर, अमरावती) व ट्रक चालक दिनेशकुमार छबराज यादव, (वय ४५ वर्ष, रा. रमबीयाल गंज, ता. मनीयाहू नि. जौनपूर, उत्तरप्रदेश) यांचा समावेश आहे. त्यांना खत परवाना व खरेदी पावती आहे अगर कसे याबाबत विचारणा केली असता त्यांनी कोणताही परवाना व खरेदी पावती नसल्याचे सांगितले. त्यामुळे त्यांना अटक करण्यात आली. त्यांच्याकडूनपिवळ्या रंगाचे १८९ बॅगप्रती बॅग ४५ किलो वजन असलेले ४. २५ लाख रुपयांचे खत, १०.९५ लाख रुपये किमतीचे पांढ–या रंगाचे ४३८ बॅग प्रती बॅग ५० किलो वजनाचे खत व १५ लाख रुपये किमतीचा ट्रक, १५ हजार रुपये किमतीची पोत्यांची शिलाई करणे करिता वापरण्यात येणारी ईलेक्ट्रीक शिलाई मशीन व दहा हजार रुपये किमतीचा इलेक्ट्रिक वजनकाटा असा एकूण ३० लाख ४६ हजार ६०१ रुपयांचा मुददेमाल ताब्यात घेण्यात आला आहे.तिन्ही आरोपी हे स्वत:च्या आर्थिक फायदया करिता शासनाने शेतक–याना दिलेल्या अनुदानाच्या खताचा काळा बाजार करताना मिळून आले. कृषी अधिकारी प्रविण विजय खर्चे, वय ४५ वर्ष, खत निरीक्षक तथा मोहिम अधिकारी जिल्हा परिषद अमरावती यांचे तकार वरून पोलीस स्टेशन नांदगाव पेठ येथे गुन्हा नोद करण्यात आला आहे. सदर गुन्हाचा पुढील तपास पोलीस स्टेशन नादंगाव पेठ करीत आहे.–

### भगवान श्री सत्यसाई सेवा संघटना, एम. एच.–२७–एटिएस ग्रुप्स तर्फे

## अंबादेवी, एकविरा देवी मंदिर परिसरात स्वच्छता उपक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४अमरावती** अंबादेवी विजयादशमी उत्सवाचे पावन पर्वावर कुलदैवत आई अंबामाई आणि एकविरा देवी माता येथे सोने (आपट्याची पाने, फुले ) श्रद्धापुर्वक अर्पण करण्याची संस्कारी परंपरा असुन रात्री ११/१२ चे सुमारास देवीमातेचे दर्शन बंद झाल्यानंतर या संपुर्ण परिसरात, रस्त्यावर, मंदिराचे आवारातील आपट्याची पाने, निर्माल्य, अन्य केरकचरा, प्लास्टिक सर्व काही उचलून स्वच्छता उपक्रम राबविण्यात आला. भगवान श्री सत्यसाई संघटनेचे भांडारवार, मोहन जिल्हाध्यक्ष गणेश कुलकर्णी, नवनित सावरकर, रविराज सावरकर, कृष्णा भांडारवार, देशमुख भाऊ, धर्माळेभाऊ, छाया किशोर कडु, निता अनिरुद्ध क्षिरसागर, सोनाली पाटणे, यांचेसह एम.एच.–२७– एटिएस ग्रुप्सचे सर्व सदस्यांनी अंबामाई व एकविरा देवी माता परिसरात रात्री १२ ते ३ वाजेपर्यंत स्वच्छता सेवा उपक्रम राबवून स्वच्छतारुपी सोनं देविमातेला अर्पण करित सेवारूपी सोने लुटत अखबा परिसर स्वच्छ केला. गत १६ वर्षांपासुन येथे हा स्वच्छता उपक्रम राबवुन सोने म्हणुन श्रद्धापुर्वक देवी

मातेला स्वच्छतारुपी सेवा अर्पण केल्यानंतर रात्री ३/४ दरम्यान, उपस्थित सर्वांना देविमातेचा प्रसाद, श्रीफळ, ओटी देण्यात येते.

येथिल संपुर्ण परिसर, रस्ते हे दसऱ्याचेपावन पर्वावर अपट्याचे पानांनी, फुलांनी खचाखच भरलेले असतात. गत, पंधरा (१६) वर्षांपासुन एम.एच.–२७–एटिएस ग्रुप्स तर्फे मंदिर, रस्ते परिसरात रात्री ११ ते सकाळी ४/५ वाजेपर्यंत स्वच्छता उपक्रम राबविण्यात येत असतो. यावेळी, भगवान श्री सत्यसाई सेवा संघटना या उपक्रमात प्रत्यक्ष सहभागी होऊन शुभेच्छा देण्याकरिता आले होते आणि, पुर्ण वेळ सहभागी झाले होते.

या उपक्रमात सौ. अंजली प्रमोद पांडे, सौ. छाया किशोर कडु, अमोल आगाशे, श्रीजय ढोबळे, सोनाली पाटणे, अनिरुद्ध क्षिरसागर, राहुल अग्रवाल, राजु आकोडे, मंगेश बडनखे, सचिन पिहुलकर,राजु आकोडे, मंगेश बडनखे, सचिन पिहुलकर, प्रकाश दाते, किशोर कडुसह चंद्रशेखरजी कुळकर्णी, सचिव श्री एकवीरा देवी संस्थान, अँड. आशिषजी लांडे, श्रीकांत डाहाळे, ऋषीकेश डाहाळे, साई डाहाळे, ललितजी तिवारी, पिन्टुभाऊ देशपांडे, धर्माळे दुधवाले इत्यादिसह आरती मंडळाचे सदस्य आणि प्रमोद पांडे उपस्थित होते.

## मेळघाट परिसराच्या विकासासाठी पूर्ण प्रयत्न करणार–उद्योग मंत्री उदय सामंत






**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४ मेलघाट–** मेळघाट परिसराच्या विकासासाठी वाव आहे. राज्य शासनाकडून यासाठी पूर्ण सहकार्य करण्यात येत आहे. शासनाच्या योजना या भागात प्रभावीपणे राबवून मेळघाट परिसराच्या विकासासाठी पूर्ण प्रयत्न करण्यात येणार असल्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी सांगितले.मेळघाट परिसरातील ७०७ कोटी रुपयांच्या विविध विकास कामांचे लोकार्पण आणि भूमिपूजन आज धारणी येथे करण्यात आले. यावेळी केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव, अनुसूचित जाती जमाती आयोगाचे अध्यक्ष आनंदराव अडसूळ, आमदार राजकुमार पटेल आदी उपस्थित होते.श्री. सामंत म्हणाले, मेळघाट परिसराच्या विकासासाठी सर्व लोकप्रतिनिधी आग्रही आहेत. या भागाचा विकास व्हावा यासाठी आमदार पटेल यांनी सुचविलेले कामे करण्यात येत आहे. तसेच आवश्यक असलेल्या विकास कामासाठी तातडीने निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. तसेच विकास कामे करण्यासाठी कोणतीही अडचण येणार नाही. या परिसराला एक संवेदनशील व्यक्तिमत्व नेतृत्व लाभले असल्याने या भागाचा कायापालट करण्यासाठी सहकार्य करण्यात येईल.श्री. जाधव यांनी, महिला शेतकरी आणि सर्व घटकांसाठी शासनातर्फे विविध योजना राबविण्यात येत आहे. गेल्या अडीच वर्षाच्या काळात या परिसरात विविध विकासकामे करण्यात आली आहे. यात लाडकी बहीण योजनेचा लाभ देण्यात आला आहे. तसेच मुलींसाठी मोफत शिक्षण, महिलांना अर्ध्या तिकिटात एसटीचा प्रवास यासह आशा सेविका, पोलीस पाटील यांचे मानधन वाढविण्यात आले आहे. बचत गट आणि मातृत्व योजनेतून महिलांना सहकार्य करण्यात आले आहे. शेतकरी सन्मान योजनेतून दरवर्षाला १२ हजार रुपयांची मदत देण्यात येत आहे. तसेच पिक विम्याची रक्कम वाढविण्यात आल्याने शेतकऱ्यांना फायदा होत आहे. येत्या काळात सर्व ठिकाणी आरोग्य सुविधा, रस्ते आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात येणार असल्याने या भागाचे चित्र बदलणार आहे.यावेळी श्री. अडसूळ यांनी अनुसूचित जाती जमातीच्या विकासासाठी कार्य करण्यात येणार असल्याचे सांगितले.कार्यक्रमात आमदार राजकुमार पटेल, बाजार समितीचे सभापती रोहित पटेल यांनी मार्गदर्शन केले. तसेच अंगणवाडी सेविका, पोलिस पाटिल, रोजगार सेवक आणि लाडकी बहिण लाभार्थींचा सत्कार करण्यात आला.

# कापुराचा वास उठन चौथाई, धुवा अतराई, गर्जना अवधुताची होते नामावरी

## झेंडे चढविण्याचा चित्त थरारक नेत्रदीप कार्यक्रम

### श्री क्षेत्र सावंगा (विठोबा) येथे दसरा-यात्रा महोत्सव संपन्न, हजारो भाविकांची उपस्थिती




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४ चांदूर रेल्वे** महाराष्ट्रातील विदर्भात प्रसिद्ध लाखो लोकांचे श्रद्धास्थान असलेले चांदुर रेल्वे तालुक्यातील श्री क्षेत्र सावंगा (विठोबा) येथील श्री विठोबा संस्थान उर्फ श्रीकृष्ण अवधूत बुवा संस्थान येथे दिनांक १२/१०/२०२३ शनीवारला दुपारी १२.०० वाजता संस्थानच्या वतीने संस्थानमध्ये चंदन-उटीचा- कार्यक्रम आणि दुपारी ४.०० वाजता दसरा निमित्त महाराजांचे झेंडे चढविण्याचा चित्त थरारक नेत्रदीप असा कार्यक्रम कापुराच्या अखंड ज्योतीने आणि भजनाच्या गजरात संस्थानचे विश्वस्त मंडळ आणि असंख्य भाविकांचे उपस्थितीत संपन्न झाला.

संस्थानचे विश्वस्त चरणदास नामदेवराव कांडलकर रा. सावंगा (विठोबा) हे नवीन वस्त्र परिधान करून यांचे शुभ हस्ते महाराजांच्या बोहलीची विधीवत पूजन तसेच दोन्ही झेंड्याची पूजा करून नवीन खोळ(कापड) घालण्याकरिता या दोन्ही झेंड्याला पायाचा स्पर्श न लागू देता दोरांच्या सहाय्याने झेंडे चढविण्याच्या कार्यक्रम विश्वस्त मंडळाचे उपस्थितीत झाला. बाहेर गावावरून येणारे भाविकांकरिता संस्थानचे अन्नदान समितीच्या वतीने भोजनाचे आयोजन करण्यात आले होते.तसेच या मांडीमध्ये बाहेर गावावरून भजनासाठी येणारे अवधूत भजन मंडळाकरीता दैनंदिन भोजन,नास्ता आणि चहा इ. व्यवस्था करण्यात आली होती.तरी हजारोच्या संख्येने सर्व भाविक- भक्तांनी या कार्यक्रमाचा लाभ घेतला, तसेच यात्रेत शांतता व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने स्वयंशिस्त दिसून आली,दरवर्षी प्रमाणे संस्थानमध्ये दैनंदिन सकाळी ५.०० ते ७.०० या कालावधीत काकडा कार्यक्रम सुरू होत आहे,तरी या कार्यक्रमात समस्त गावकरी मंडळी आणि भाविक भक्तांनी सहभागी व्हावे,सर्व भाविक-भक्तांनी नित्य नियमाने सुरु असलेल्या संस्थान च्या विविध कार्यक्रमाकरिता तन-मन-धनाने सहकार्य करून या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, अशी विनंती संस्थानचे अध्यक्ष पुंजाराम नेमाडे, उपाध्यक्ष कृपासागर राऊत, सचिव अशोक सोनवाल, सर्व विश्वस्त विनायक पाटील, वामन रामटेके, गोविंद राठोड, दिगांबर राठोड, अनिल बेलसरे, फुलसिंग राठोड, चरणदास कांडलकर, वैभव मानकर, स्वप्नील चौधरी समस्त विश्वस्त मंडळाच्या वतीने करण्यात येत आहे.

# दिवंगत नेता बाबा सिद्दीकी यांना राष्ट्रवादी परिवाराकडून श्रद्धांजली

## राकॉ नेता संजय खोडके,आ. सौ. सुलभाताई खोडके यांनी व्यक्त केली शोक संवेदना




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४अमरावती-** राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी चे जेष्ठ नेता तथा माजी राज्यमंत्री बाबा सिद्धीकी यांच्या दुःखद निधनाबद्दल अमरावती मधील राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीमध्ये शोक व्यक्त होत आहे. त्यांच्या निधनाची वार्ता कळताच रविवार १३ ऑक्टोबर रोजी शहरात होणारी उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांची जनसन्मान यात्रा सुद्धा रद्द करण्यात आली. दिवंगत नेता बाबा सिद्धिकी यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी आज गाडगे नगर स्थित संत गाडगे बाबा समाधी मंदिर प्रांगणात राष्ट्रवादी परिवाराकडून शोकसभा बोलावून त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष संजय खोडके व आ. सौ. सुलभाताई खोडके यांनी बाबा सिद्दीकी यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केले. तसेच त्यांच्या प्रतिमेला पुष्प वाहून श्रद्धांजली अर्पण केली. दिवंगत नेता बाबा सिद्धीकी हे सर्व क्षेत्रात व्यापक जनसंपर्क, लोकप्रिय, मनमिळावू स्वभाव व काम प्रिय व्यक्ती होते. तीनवेळा आमदार राहिलेले बाबा सिद्धीकी यांना विधिमंडळ कामकाजाचा अनुभव असल्याने एक उत्तम नेता म्ह्णूनही त्यांची ख्याती होती. त्यांच्या निधनाने एका अष्टपैलू नेत्याला आपण मुकलो असल्याची शोक संवेदना राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष संजय खोडके यांनी व्यक्त केली. तर आ.सौ.सुलभाताई खोडके यांनी सुद्धा राकॉ नेता बाबा सिद्दीकी यांच्या दुःखद निधनाबद्दल दुःख व्यक्त करीत शोकसंवेदना प्रकट केली. यावेळी उपस्थित राष्ट्रवादी परिवारातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सुद्धा दिवंगत नेता बाबा सिद्दीकी यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून श्रद्धांजली अर्पण केली.-

# पक्षभेद विसरून प्रहार रुग्णसेवकाने जोपासली माणुसकी

### कट्टर राजकीय विरोधक बबलू देशमुख यांच्या वाहन चालकाला अपघात क्षणी तात्काळ दिला मदतीचा हात




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४अचलपुर** अमरावती जिल्ह्यात बबलु देशमुख व बच्चु कडु यांची राजकीय जुगलबंदी प्रसिध्द आहे. बबलु देशमुख हे बच्चु कडु व प्रहार वर नेहमी आरोप करीत असतात. परंतु हीच प्रहार बबलु देशमुख यांच्या वाहनचालकासाठी देवदुत म्हणुन अवतरली आहे. बबलू देशमुख यांच्या गाडीवरचे ड्रायव्हर यांचा अपघात झाला असताना त्यांना कोणीही उचलायला तयार नव्हते. यावेळी प्रहारची रुग्णवाहीका हृद्यरोगाचा पेशंट घेऊन अमरावती करीता येत होती. प्रहार कार्यकर्ता व रुग्णवाहीका चालक हेमंत कोंडे यांनी पक्षविरहीत माणुसकीचे दर्शन दाखवत अपघात स्थळावरुन त्यांना घेऊन इर्विन हॉस्पीटल येथे पुढिल उपचाराकरीता भरती केले.या कृतिची सर्वत्र प्रशंसा होत आहे.

# दसरा महोत्सवात हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या पारंपरिक खेळ, कवायतींचे सादरीकरण





**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४अमरावती-** अमरावतीच्या हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या (एचव्हीपीएम) ऐतिहासिक दसरा महोत्सवाला यंदा ९२ वर्षे पूर्ण होत असून, यानिमित्त रणरागिणी विद्यार्थिनींसह ३००० विद्यार्थीनि शनिवारी सायंकाळी ६ पासून दसरा मैदानावर विविध पारंपरिक, आधुनिक खेळांची थरारक प्रात्यक्षिके , तलवारबाजी, दांडपट्टा, मल्लखांब या स्फूर्तिदायक खेळांमधील कौशल्य व दुर्गा सप्तशतीमधील राक्षस वधाचे प्रसंग साकारून महाशक्तीचा जागर केला . विशेष म्हणजे पहिल्या दसरा महोत्सवाचे उद्घाटन नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या हस्ते झाले होते.'बलो उपास्व' निरोगी समाज, बलवान राष्ट्र निर्मितीचे ध्येय अविरत जोपासत एचव्हीपीएम भारतीय संस्कृती, पारंपरिक खेळ आणि अद्ययावत शिक्षणाच्या माध्यमातून युवा पिढीला सक्षम करत आहे. याचाच एक भाग म्हणून पारंपरिक दसरा महोत्सव सातत्याने आयोजित केला जातो. मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य यांचा पु[illegible] व सचिव प्रा. डॉ. माधुरी चेंडके यांच्यासह सर्व प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनात सकाळी व सायंकाळी विद्यार्थी, विद्यार्थिनी विविध खेळ व कवायतींचा सराव करतात व विजयादशीच्या दिवशी दसरा महोत्सवाला ती प्रात्याक्षिके सादर करतात यामध्ये ढाल-तलवार, भाला ड्रिल, लेझीम, दांडपट्टा, मल्लखांब, रोप मल्लखांब, योग, जळती जोडी कवायती, ॲरोबिक्स, जिम्नॅस्टिक्स, डम्बेल्स, बॉक्सिंग, शरीर सौष्ठव, दंड बैठक यांचा समावेश असतो हि प्रताप्क्षिके पाहण्यासाठी अमरावती कर नागरिक दसरा मैदानावर मोठ्या संख्येने उपस्थित असतात .

# अकोल्याचा शुभम वर्षभरापासून लॉरेन्स टोळीच्या संपर्कात



अग्निशस्त्रांसह (पिस्तुल) अजय देटे आणि प्रफुल्ल चव्हाणला अकोला पोलिसांनी अटक केली होती.

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४ अकोला-** वैदर्भीय शुभम लोणकर हा खतरनाक बिश्नोई गँगच्या वर्षभरापूर्वीपासून सलग संपर्कात होता. जानेवारी २०२४ मध्येच ही धक्कादायक माहिती विदर्भातील काही उच्चपदस्थ पोलीस अधिकाऱ्यांना माहित झाली होती. दरम्यान, माजी मंत्री बाबा सिद्दिकी यांच्या हत्याकांडामुळे पुन्हा एकदा चर्चेला आलेला गँगस्टर लॉरेन्स बिश्नोईचे विदर्भ कनेक्शन आता ९ महिन्यात दुसऱ्यांदा उघड झाल्यामुळे तपास यंत्रणांमध्ये खळबळ निर्माण झाली आहे.

पंजाबी गायक सिद्धू मुसेवाला हत्याकांडानंतर प्रकाशझोतात आलेल्या लॉरेन्स बिश्नोईने अभिनेता सलमान खानला धमकी दिल्यापासून बिश्नोई टोळीचा गुन्हेगारी जगतात सर्वत्र बोलबाला सुरू झाला. त्यानंतर तपास यंत्रणांकडून त्याचे नेटवर्क तपासण्यात येत असतानाच १६ जानेवारी २०२४ ला दोन

त्यावेळी शुभम लोणकरने हे पिस्तुलं त्यांना विकल्याचं उघड झाल्यानंतर शुभमला अटक करण्यात आली होती. त्यावेळी पोलिसांनी त्याचा मोबाईल तपासल्यानंतर अवघी तपास यंत्रणाच चाट पडल्यासारखी झाली होती.

उच्चपदस्थ सुत्रांनुसार, लॉरेन्सचा भाऊ अनमोल बिश्नोई हा महाराष्ट्रासह दिल्ली एनसीआर आणि बिहारच्या गुन्हेगारी जगताचे नेटवर्क सांभाळतो. त्याच अनमोल बिश्नोईच्या शुभम लोनकर सातत्याने संपर्कात असल्याचे उघड झाले होते.तो नियमित व्हॉटसअॅप, व्हिडीओ कॉलच्या माध्यमातून विदर्भातील गुन्हेगारी वर्तुळातील घडामोडींची तसेच वेगवेगळ्या डीलची माहिती टोळीला पुरवित होता, हेदेखील उजेडात आले होते. ही धक्कादायक माहिती त्यावेळीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांमध्येही चर्चेला आली होती.

आता बाबा सिद्दीकी हत्याकांडाची जबाबदारी शुभम लोणकरच्या आयडीवरून स्विकारण्यात आल्याने शुभम पुन्हा एकदा तपास यंत्रणांमध्ये चर्चेला आला आहे. खास सूत्रांच्या माहितीनुसार, लॉरेन्स गॅंगमधील इंटरनेटच्या किड्यांनी सोशल मीडियावर आपले जाळे विणले आहे. ते वेगवेगळे ग्रुप बनवून गुन्हेगारीचे आकर्षण असलेल्या तरुणांना या ग्रुपमध्ये सहभागी करून घेतात.

# बाबा सिद्दीकीच्या हत्येतील आरोपीची आई ढसाढसा रडली

## मुलगा असे हि करू शकतो यावर विश्वास बसत नाही




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४ बहराइच युपी-** मुंबईतील वांद्रे परिसरात शनिवारी रात्री झालेल्या राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अजित पवार गटाचे नेते बाबा सिद्दीकी यांच्या हत्येचे प्रकरण आणखीनच जोर पकडताना दिसत आहे. या हत्येप्रकरणी तुरुंगात असलेल्या लॉरेन्स बिश्नोईच्या टोळीचा सहभाग असल्याचे समोर येत आहे,

दरम्यान, ही हत्या करणाऱ्या आरोपींपैकी शिवकुमार उर्फ शिवा गौतमच्या आईचे जबानी समोर आले आहे. शिवाची आई यूपीच्या बहराइचमध्ये कॅमेऱ्यासमोर ढसाढसा रडली. त्या म्हणतात की, आपला मुलगा ही घटना करू शकतो यावर विश्वास बसत नाही.

बाबा सिद्दीकी यांच्या हत्येचा आरोप असलेल्या शिवकुमार आणि शिवा गौतमची आई सुमन म्हणाली, 'या घटनेची माहिती मिळताच मी रडायला लागली. यावर विश्वास ठेवणे कठीण आहे. आता काय करावे हे मला कळत नाही. शिवा पुण्याला एका भंगाराच्या दुकानात कामासाठी गेला होता आणि होळीच्या वेळी गावाला शेवटचा गेला होता. आरोपी शिवा गौतम हा यूपीच्या बहराइचमधील कैसरगंज कोतवाली येथील गंडारा गावचा रहिवासी आहे.

आरोपी शिवाची आई रडत रडत म्हणाली, 'आम्हाला याबद्दल आधी माहिती नव्हती, पण बातमीत बातमी ऐकताच आम्ही रडू लागलो आणि आमचे बीपी कमी झाले.' आमच्या मेव्हण्याने औषध आणले. शिव हे करेल अशी अपेक्षाही आम्हाला नव्हती. आता आपण काय करावे, मला समजत नाही. पूर्वी आम्ही शिवाशी बोलायचो पण आता बरेच दिवस त्याच्याशी बोलत नाही. होळीनंतर तो येथून निघून गेला.

शिवाच्या आईने सांगितले की, 'गावातील मुलगा हरी याच्या मोबाईलवरून आम्ही शिवाशी बोललो होतो. तो पुण्यात भंगार विक्रेत्याच्या कामासाठी गेला होता. याशिवाय आमच्याकडे कोणतीही माहिती नाही. ही घटना ऐकल्यापासून आम्ही फक्त रडत होतो.

# कारची दुचाकीला धडक; औषधी विक्रेत्याचा मृत्यू




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४अमरावती** कुह्याहून अमरावतीकडे जाणाऱ्या भरधाव कारची विरुद्ध दिशेने येणाऱ्या दुचाकीला धडक बसली. या अपघातात दुचाकीस्वार औषधी विक्रेत्याचा मृत्यू झाला तर कारमधील व्यक्ती गंभीर जखमी झाला. येथून एक किलोमीटर अंतरावरील वळणावर ही घटना दुपारी साडेतीन ते चार वाजताच्या सुमारास घडली.लक्ष्मीकांत सुभाष मुंदडा (वय ३२, रा. पिंपळखुटा, ता. धामणगावरेल्वे) असे दुचाकीस्वार मृताचे तर सौरभ नितेश सोळंकी (रा. ओडीशा) असे जखमीचे नाव आहे. लक्ष्मीकांत मुंदडा यांचे अमरावतीला औषधी विक्रीचे दुकान असून ते त्यांच्या दुचाकीने (एमएच २७ सीएफ ८११३) अमरावतीहून गावाकडे येत होते तर कार (एमएच १४ जेई ८८००) हीकुह्यकडून अमरावतीकडे जात होती. कुह्यापासून एक किलोमीटर अंतरावरील वळणावर भरधाव कारची दुचाकीला भीषण घडक बसली. या अपघातनंतर कार रस्त्याच्या कडेला असलेल्या दिशादर्शक फलक व पळसाचा झाडाला मुळासकट पाडून उलटली.

# राष्ट्रीय पोषण महामते अमरावती जिल्ह्यांचा डंका

## दोन-दोन पुरस्कार मिळवून अमरावती जिल्हा राज्यात अव्वल!



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४ अमरावती**

राष्ट्रीय पोषण महात वेगवेगळे उपक्रम राबवून अमरावती जिल्ह्याला यावर्षी महाराष्ट्र राज्यातून दोन दोन पुरस्कार मिळाले आहेत. राष्ट्रीय पोषण महाच्या निमित्ताने महिनाभर सतत महिला व बालविकास विभागामार्फत वेगवेगळे उपक्रम राबविण्यात येतात यामध्ये यावर्षी सुद्धा अमरावती जिल्ह्याने अतिशय उत्तम रित्या उपक्रम राबवत गावागावा मध्ये लाभार्थ्यांना सहभागी करून घेतले आणि जे उपक्रम राबवले ते केंद्र शासनाचे वेबसाईटवर अपलोड सुद्धा केले यामध्ये अमरावती जिल्हा अव्वल स्थान प्राप्त झाले आज माननीय नामदार आदिती तटकरे यांच्या हस्ते डॉ कैलास घोडके आणि प्रतिनिधी स्वरूपात पर्यवेक्षिका ,अंगणवाडी सेविका, विस्तार अधिकारी आणि बाल विकास प्रकल्प अधिकारी यांना गौरविण्यात आले यावेळी सचीव अनुप कुमार यादव आणि आयुक्त कैलास पगारे हे उपस्थित होते.

अमरावती जिल्ह्याने संपूर्ण महिनाभर यावर्षी आणि गेल्या वर्षी सूक्ष्म नियोजन करून ज्या वेगवेगळ्या उपक्रम राबविले त्यात जिल्ह्याने अव्वल स्थान प्राप्त केले असून याबद्दल जिल्ह्यांचा जो गौरव झाला त्याचा मला सार्थ अभिमान आहे

**संजीता महापात्र**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जि.प.अमरावती**

# कसबेगव्हाण येथील पुनर्वसित पाचशे ग्रामस्थांच्या जीवनात उजाडली नवी पहाट

## अखेर ९४ पुनर्वसित कुटुंबांचा १७ वर्षाचा वनवास संपला : एक कोटीच्या निधीतून होतील मुलभूत विकासकामे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**

कसबेगव्हाण येथील भुलेश्वरी नदीला २००७ साली आलेल्या महापुराने ११५ घरांची माती झाली ..प्रशासनाने २०१३ साली ९४ कुटुंबियांचे गावाजवळच अडीच एकर शेतजमिनीवर पुनर्वसन केले..पुनर्वसन करताना त्या ग्रामस्थांना मुलभूत सुविधा पुरविण्याच्या जबाबदारीचा मात्र प्रशासनाला विसर पडला होता.आजही दहा वर्षानंतर पुनर्वसित पाचशे ग्रामस्थांना मुलभूत सुविधा पासून वंचित राहावे लागत होते. अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत ...विद्युत व पाणी वगळता इतर कुठल्याही मुलभूत सुविधा या ग्रामस्थांना अद्यापही उपलब्ध नव्हत्या ...रस्ते ,नाल्या कश्याचीही सुविधा या ठिकाणी नव्हती ...पुनर्वसन करतांना बाधित कुटुंबियांना सर्व मुलभूत सुविधा पुरविण्याचे बंधनकारक असतांना केवळ प्रशासनाच्या अक्षम्य दिरंगाईने



या पुनर्वसित ग्रामस्थांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत होते.परिसरात वाढलेल्या काटेरी झुडप्यांनी त्यांच्या रोजच्या जगण्याची वाट अवघड झाली होती.खुल्या जागेवर सांडपाण्याचे डबके निर्माण झाल्याने येथील ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात आले होते.पण एक कोटीची तरतूद केल्याने पुनर्वसित नागरिकांच्या जीवनात नवी पहाट उजाडली आहे..

सरपंच शशिकांत मंगळे यांच्या हस्ते नुकतेच या कामांचे झाले.भूमिपूजन२०१३ मध्ये पुनर्वसन झाल्यावर २०१४ पर्यंत त्या सर्व पुनर्वसित नागरिकांना मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याबाबतची तरतूद अंदाजपत्रकामध्ये होती. १७ लाखांचे अंदाजपत्रक मुलभूत सुविधा पुरविण्याबाबत तयार करण्यात आले होते .मात्र जिल्हाधिकारी कार्यालायासह विभागीय आयुक्त कार्यालयाच्या लालफितशाही मध्ये तरतूद असूनही अंमलबजावणी न झाल्याने प्रशासनाच्या कार्यतत्परतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते.

पुनर्वसित कुटुंबियांना मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत कसबेगव्हाण चे सरपंच शशिकांत मंगळे मागील वर्षापासून जिल्हाधिकारी ,विभागीय आयुक्त यांचे कडे सतत पाठपुरावा करत होते.या काळात त्यांनी अनेकदा प्रशासनाला पत्रे दिलीत . सुरुवातीला १७ लाखात ज्या मूलभूत सुविधा प्राप्त झाल्या असत्या त्याचा अनुशेष वाढतच गेला. २०२१ मध्ये आमदार बच्चु कडू राज्यमंत्री झाल्यानंतर खऱ्या अर्थाने या कामाला गती प्राप्त झाली.पण दप्तर दिरांगाईचा त्याला सुद्धा फटका बसला ..अखेर तीन वर्षानंतर आमदार बच्चु कडू यांच्या प्रयत्नानेच एक कोटीचा निधी पुनर्वसित नागरिकांना सोयी सुविधा प्राप्त करून देण्यासाठी प्राप्त झालेला आहे. त्या अंतर्गत रस्त्यांचे खडीकरण , नाल्या व रपटे तसेच पोच मार्गाचे खडीकरण दुरुस्तीची कामे ही पार पडणार आहेत.पुनर्वसित ग्रामस्थांनी मोकळा श्वास घेतला असून आमदार बच्चू कडू यांचे आभार व्यक्त केले आहेत..सदर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी श्री. अमोल घुरडे, उपाध्यक्ष किसान जिनिंग व संचालक जिल्हा सहकारी बोर्ड यांनी भूषविले व या प्रसंगी प्रमुख उपस्थिती श्री. प्रशांत दामले उपसरपंच, श्री सुधाकर शिंगणे, श्री वैभव झटाले, श्रीमती शागिराबी, सौ. विजयाताई ठाकरे, सौ. शरदाताई दामले, सौ. वृषाली चित्रकार, सौ रेखाताई हंबर्डे, सौ राधिका हिवराळे व श्री. विजय कथलकर ( ग्राम विकास अधिकारी) तसेच गावातली मान्यवर श्री. मनोहर टेकाडे, श्री. गजानन शिंगणे, श्री. रविंद्र चित्रकार, श्री. करीम भाई , श्री. सादिक भाई, श्री. शब्बीर शाह, व श्री रियाज भाई हे उपस्थीत होते.

# प्रशिक्षणासाठी राज्यातील १४७ निवडणूक अधिकारी अमरावतीत

## ५ दिवस गिरवणार धडे, पहिल्यांदाच असे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**

आगामी विधानसभा निवडणुकीची प्रशासकीय तयारी करण्याच्यादृष्टीने येथील डॉ. पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय प्रबोधिनीमध्ये राज्यभरातील निवडणूक व सहायक निवडणूक अधिकाऱ्यांना प्रशिक्षण दिले जात आहे. यामध्ये विविध ठिकाणांहून आलेले १४७ निवडणूक अधिकारी सहभागी झाले आहेत.


हे प्रशिक्षण पाच दिवस चालणार आहे. निवडणूकविषयक अशा प्रकारच्या शिबिरात एवढ्या



मोठ्या प्रमाणात राज्यभरातील अधिकारी सहभागी होण्याची ही पहिलीच वेळ आहे. आज, रविवारी सकाळी या शिबिराचे उद्घाटन झाले. भारत निवडणूक आयोगाचे अतिरिक्त राज्य निवडणूक अधिकारी प्रदीप पी. अमरावती जिल्ह्याचे मुख्य निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी सौरभ कटियार, विभागीय अपर आयुक्त संजय पवार, प्रबोधिनीचे संचालक अजय लहाने, उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे आदींनी दीप प्रज्वलीत करुन या शिबिराचे उद्घाटन केले.

शिबिरात राष्ट्रीय पातळीवरील साधन व्यक्ती तथा भारत निवडणूक आयोगाच्या प्रदेश कार्यालयाचे प्रधान सचिव एस.बी. जोशी, अवर सचिव संदीप कुमार आणि सचिव बिनोद कुमार, जम्मू-काश्मीरचे चंदकिशोर शर्मा, उत्तराखंडचे अखिलेशकुमार शर्मा, मध्यप्रदेशचे पी. एन. सनेसर, उत्तरप्रदेशचे हिमांशू गौतम, मेघालयच्या अनिता खारपोर अशी दिग्गज मंडळी निवडणूकविषयक धडे देत आहेत. यामध्ये उमेदवारी अर्ज दाखल करण्यापासून ते मतमोजणीअंती निकाल घोषित करण्यापर्यंतच्या सर्वच प्रक्रियांचा समावेश आहे. येथील उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे आणि त्याच विभागाचे नायब तहसीलदार प्रवीण देशमुख यांच्या नेतृत्वात हे शिबीर पुढे जात आहे.

# श्री अंबादेवी संस्थानच्या अध्यक्षपदी ॲड. दिपक श्रीमाळी तर उपाध्यक्षपदी किशोर बेंद्रे





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**

श्री अंबादेवी संस्थानची आमसभा रविवारी संस्थानच्या मंदिरात पार पडली. संस्थानच्या अध्यक्षा विद्याताई देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या सभेत सन २०२५ ते २०३९या पंचवार्षिक निवडणुकीची प्रक्रिया पार पडली. या सभेत अंबादेवी संस्थानचे अध्यक्ष म्हणून ॲड दीपक श्रीमाळी यांची एकमताने निवड करण्यात आली. सचिवपदी रविंद्र कर्वे व डॉ जयंत पांढरीकर, उपाध्यक्षपदी किशोर बेंद्रे तर कोषाध्यक्ष म्हणून विलास मराठे यांची निवड करण्यात आली. आमसभेला उपाध्यक्ष डॉ आनंद पळसोदकद, मिनाताई पाठक, दीपा खांडेकर, विजया गुढे, शैलेष पोतदार, सुरेंद्र बुरंगे, अशोक खंडेलवाल, ॲड राजेंद्र पांडे, व्यवस्थापक सुर्यकांत कोल्हे तसेच कर्मचारी उपस्थित होते.

# विश्रांती घेतलेला पाऊस राज्यातील काही भागांत पुन्हा सक्रिय

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४नागपूर**

काही दिवसांपासून विश्रांती घेतलेला पाऊस राज्यातील काही भागांत पुन्हा सक्रिय झाला आहे. तर, काही ठिकाणी परतीच्या पावसाने हजेरी लावल्यानंतर पावसाचा जोर काहीसा कमी होताना पाहायला मिळत आहे. आज कोकण, मध्य महाराष्ट्र व विदर्भातील काही जिल्ह्यात पाऊस पडण्याची शक्यता आहे.



नैऋत्यमौसमी पावसाने बिहार, झारखंडच्या उर्वरित भागातून तर पश्चिम बंगाल आणि सिक्कीमच्या पूर्व भागातून तर छत्तीसगड, मध्य प्रदेशच्या आणखी काही भागातून माघारी फिरला आहे.

आज कोकणातील सर्व जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी वादळी वाऱ्यासह हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्रातील बऱ्याच जिल्ह्यात तर मराठवाड्यातील काही जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी वादळी वाऱ्यासह हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे.

त्याचबरोबर विदर्भातील सर्व जिल्ह्यात तुरळक ठिकाणी वादळी वारा व वीजांचा कडकडाट होण्याची शक्यता आहे. पुणे आणि परिसरातील हवामानाचा अंदाज अशा प्रकारे आहे पुढील तीन ते चार दिवस आकाश सामान्यतः ढगाळ राहून मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाट सहित हलका स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे.

# गावोगावी भारनियमन, कोठून आणणार इलेक्ट्रिक वाहनांना वीज

## वाहनांच्या खरेदीवर दहा हजार रुपयांपासून एक लाख रुपयांपर्यंतची सूट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**

पेट्रोल आणि डिझेलच्या वाढत्या किमती लक्षात घेता वाहनचालकांनी यावर मात करण्यासाठी इलेक्ट्रिक वाहनांची खरेदी सुरू केली आहे. यातूनच इलेक्ट्रिक वाहनांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. ग्राहकांची मागणी आणि जुन्या वाहनातील त्रुटीचा अभ्यास करून बाजारात सुधारित नवी वाहने आली आहेत. ही वाहने सर्वाधिक लोकप्रिय होत आहेत.

विशेष म्हणजे या वाहनांच्या दुरुस्तीसाठी स्थानिक पातळीवरच व्यवस्था करण्यात आली आहे. संपूर्ण जिल्ह्यात इलेक्ट्रिक वाहनांची संख्या वाढत आहे. मात्र, ही संख्या केवळ शहरी भागात वाढली आहे.

यासोबतच प्रवासी वाहतूक आणि मालवाहतुकीसाठी इलेक्ट्रिक वाहनांची आता खरेदी होत आहे. वाहतूक व्यवस्थेत नवा बदल यातून पाहायला मिळत आहे. वाहनांच्या खरेदीसह ग्राहकांची पसंती आणि



भविष्यातील अडचणी लक्षात घेता वाहनांच्यानिर्मितीवर कंपन्यांनी लक्ष केंद्रित केले आहे. यामुळे वाहनांची खरेदी क्षमतेपेक्षा अधिक वाढलेली आहे. याशिवाय मुबलक प्रमाणात सहजगत्या कर्ज उपलब्ध होत असल्याने वाहनधारकांनी वाहनांच्या खरेदीचा जोर वाढवला आहे. शहरी भागापेक्षा ग्रामीण भागात इलेक्ट्रिक वाहने खरेदी करण्यासाठी नागरिकांची पसंती असली, तरी गावपातळीवर वीज गुल होण्याचे प्रमाण अधिक असल्याने अशा वाहनांची खरेदी ग्रामीण भागातून थांबली आहे.

दुचाकी वाहनांमध्ये इलेक्ट्रिक वाहनांची 'क्रेझ' पाहायला मिळत आहे. जिल्ह्यामध्ये दसऱ्याच्या पर्वावर ७०पेक्षा अधिक इलेक्ट्रिक वाहनांची नोंद झाली आहे तर १०० इतर वाहने खरेदी केली जात आहेत. मोठ्या प्रमाणात दुचाकींची विक्री होण्याचे प्रमाण यावर्षी प्रथमच पाहायला मिळत आहे. याला अनेक बाबी कारणीभूत आहेत. मात्र, इलेक्ट्रीक चींग स्टेशन नसल्याने मोठी अडचण होत आहे.

# प्राथमिक शिक्षक समितीची विषय नियामक सभा संपन्न

## जिल्हाध्यक्ष पदी अजयानंद पवार,जिल्हा सरचिटणीस पदी शैलेन्द्र दहातोंडे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती अमरावती जिल्हा शाखेची विषय नियमक सभा रविवार दिनांक १३ ऑक्टोबर रोजी सुयोग मंगल कार्यालय अमरावती येथे संपन्न झाली. या सभे करीता विषय नियामक सभा निरिक्षक म्हणुन राज्याध्यक्ष विजय कोंबे, सहनिरिक्षक प्रशांत निंभोरकर (वर्धा जिल्हा कार्यालयीन चिटणीस), पवन बानोकर (वर्धा जिल्हा समाज माध्यम प्रभारी)राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर,राज्य महीला प्रतिनिधी प्रविणा कोल्हे,जिल्हाध्यक्ष गोकुलदास राऊत,जिल्हा सरचिटणीस संभाजी रेवाळे,जिल्हा कार्याध्यक्ष प्रशांत निमकर,जिल्हा कोषाध्यक्ष नंदकिशोर पाटील,जिल्हा प्रसिध्दी प्रमुख शैलेन्द्र दहातोंडे,महीला आघाडी प्रमुख सरीता काठोळे,कोषाध्यक्ष भावणा ठाकरे,जुनी पेन्शन आघाडी प्रमुख अल्हाद तराळ,सरचिटणीस प्रेमसुख ठोंबरे,कार्याध्यक्ष निलेश कांडलकर,कोषाध्यक्ष पंकज दहीकर,सेवानिवृत्त समितीचे जिल्हाध्यक्ष अशोक पारडे उपस्थित होते.कै.भा.वा.शिंपी गुरुजी यांच्या फोटोचे पुजन करुन हारार्पण करण्यात आले.मान्यवरांचा शाल व बुके देऊन सत्कार करण्यात आला.सभेचे प्रास्ताविक संभाजी रेवाळे यांनी तर सुत्रसंचालन शेलेन्द्र दहातोंडे यांनी आभार प्रदर्शन अजयानंद पवार यांनी मानले. यावेळी जिल्हा नुतन कार्यकारीनी निवड करण्यात आली.या मध्ये जिल्हा शाखेचे अध्यक्ष म्हणून अजयानंद पवार (अचलपूर) आणि सरचिटणीस म्हणून शैलेंद्र दहातोंडे (भातकुली) यांची सर्वानुमती निवड करण्यात



आली.जिल्हा नेते म्हणून मावळते अध्यक्ष गोकुलदासजी राऊत आणि जिल्हा सल्लागार म्हणून मावळते जिल्हा सरचिटणीस सदानंद जी रेवाळे यांची निवड झाली. जिल्हा कार्याध्यक्ष प्रशांत निमकर, जिल्हा कोषाध्यक्ष नंदकिशोर पाटील,जिल्हा कार्यालय चिटणीस मनीष काळे यांची निवड झाली.महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष म्हणून सरिता काठोळे, सरचिटणीस विनिता गुलक्षे यांची निवड करण्यात आली. यावेळी वंदना बंड कु. विद्या रा. कोथळकर सौ. रुपाली भा. राऊत सौ. सरिता काठोळे जि सौ. सरिता पाचघरे सौ. तारा भाकरे कु. लता टेंभरे, भावना श्री. ठाकरे कु सुरेखा सौ विनिता घुलते सौ.संगिता तडस सौ. लिनता अ.पवार,नितिन देशमुख, जयेश प्र. दाभाडे,रामेश्वर आठवले,रत्नाकर पडोळे,रविंद्र सु.श्रीखंडे, प्रमोद रा. ढाकुलकर, राजेश रतनलाल गुप्ता,प्रफुल्ल शेंडे,विनोद पाल,संदीप कविटकर, विजय बा. सरोदे शामकांत तडस, प्रफुल्लकुमार वाठ,उमेश चुनकीकर,राजेश ठाकरे,प्रफुल्ल होले,अकल उघडे,सुनील रा. बोकाडे, ज्ञानेश्वर लांजेवार वैजनाथ फड, राहुल रा. वानखडे , निलेश स. कांडलकर, रामचंद्र महादेव चव्हाण, रमेश अजाबराव झाकर्डे, विजय खोडस्कर,सौ, वंदना गावडे सौ. संध्या पाटील,स्वाती चव्हाण, सुशिला आत्राम, चंद्रकांत कुळकर,विजय राऊत,जगदिश वानखडे, मनिष येवले,विलास चौखंडे गजानन कावलकर, तुळशिदास धांडे, नंदकिशोर रायबोले,इंदिरा रेवसकर,अर्चना शुक्ला, जयश्री सोळंके,प्रणाली मालधूरे, द्वारका सरिमा गाडगे , भारती शुः राणे, सौः सरिता,सौ.तारा बि. भाकरे,सौ. दिपाली के मोडेकर, सौ. सोनाली से धोटे कु. विद्या कोळमकर कु. जयश्री रा. शेकार, नितीन सा देशमुख,नितिन अविनाशे, संजय शेलोकार, धनंजय डांगे,योगीराज मोहोड,विवेक ठाकरे सह सर्व तालुका शाखांचे पदाधिकारी उपस्थित होते.

# आता बस स्थानकांवर घ्या मोफत उपचार

## महामंडळाची योजना; आनंद आरोग्य केंद्रामार्फत होणार तपासणी, प्रवाशांना मिळणार दिलासा

अरुण जोशी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**



महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून प्रवाशांसाठी विविध सवलती दिल्या जात आहेत. आता महामंडळाने बस स्थानकांमध्ये आरोग्य सेवेसाठी एक पाऊल पुढे टाकण्याचा निर्णय घेतला आहे. एसटी महामंडळाने राज्यातील ३४३ बस स्थानकांवर 'आनंद आरोग्य केंद्र' नावाने दवाखाना सुरू केला जाणार असल्याची घोषणा नवनियुक्त अध्यक्षांनी केली. यानुसार बस स्थानकांच्या ठिकाणी सर्व नागरिकांना डॉक्टरांच्या सल्लयासह कमी दरात विविध चाचण्या आणि औषधी मिळण्यास मदत होणार आहेत.

प्रवाशांच्या सेवेसाठी हे ब्रीद घेऊन एसटी महामंडळाची लालपरी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात धावत आहे. त्यामुळे प्रवासीही वाट पाहीन, पण एसटीनेच जाईन, अशी भूमिकाघेत आहेत. सुरक्षित प्रवासाची हमी असल्याने अनेकजण एसटीला प्राधान्य देतात. दरम्यान, शासनाने विविध घटकांतील प्रवाशांसाठी प्रवासात सवलती दिल्याने दिवसेंदिवस संख्या वाढत आहे. त्यातच आता महामंडळानेबस स्थानकात प्रवाशांना 'आनंद आरोग्य केंद्र' नावाने दवाखाना सुरू केला जाणार आहे. लवकरच प्रवाशांच्या सेवेत आरोग्य केंद्र सुरू होणार असल्याचे महामंडळाकडून सांगण्यात आले. त्यामुळे प्रवाशांनाप्रवासादरम्यान आता आरोग्यसेवेचाही लाभ मिळण्यास मदत होणार आहे. अमरावती येथील मध्यवर्ती बस स्थानकात आनंद आरोग्य केंद्र लवकरच सुरू करण्यात येणार आहे.

### काय आहे आनंद आरोग्य केंद्र ?

धर्मवीर आनंद दिघे यांच्या स्मरणार्थ महाराष्ट्रातील एसटीच्या सर्व बस स्थानकांत 'आनंद आरोग्य केंद्र' नावाने दवाखाना सुरू केला जाणार आहे. यात माफक दरात बसस्थानकातील प्रवाशांच्या आरोग्य चाचण्या, औषधी एकाच छताखाली उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

### चालक, वाहकांची मोफत तपासणी

एसटीच्या उत्पन्नात भर टाकण्यासाठी चालक, वाहकांवर मोठी भिस्त आहे. त्यामुळे त्यांचे आरोग्य सुदृढ राहावे, यासाठी ४० वर्षांवरील चालक-वाहकांची आरोग्य तपासणी केली जाणार आहे. यात सीबीसी, थायरॉईड, कोलेस्ट्रॉल, लिव्हर फंक्शन, किडनी फंक्शन, ईसीजी, मॅमोग्राफी (महिलांसाठी) आदींची बस स्थानकातच तपासणी केली जाणार आहे.

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना : गॅस जोडणी स्वत:च्या नावावर करा अन् अनुदान मिळवा...!

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**



मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेअंतर्गत मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या पात्र लाभार्थींच्या कुटुंबाला एका वर्षात ३ गॅस सिलिंडरचे पुनर्भरण मोफत करून दिले जात आहे; परंतु अनेक ठिकाणी गॅस सिलिंडर जोडणी कुटुंबातील पुरुषांच्या नावे असल्याची बाब समोर आली. त्यामुळे राज्य शासनाने त्यात बदल केला आहे. कुटुंबातील पुरुषांच्या नावे असणारी गॅस जोडणी त्याच घरातील महिलाने स्वतःच्या नावावर करून घेतल्यास मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेचा लाभ घेता येणार आहे.

राज्यातील लाभार्थींना प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेच्या, तसेच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या पात्र लाभार्थींच्या कुटुंबाला एका वर्षात ३गॅस सिलिंडरचे पुनर्भरण (रिफील) मोफत उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यासाठी राज्य शासनाने मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना सुरू केली आहे. ३० जुलै २०२४ रोजीच्या शासन निर्णयात मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेची कार्यपद्धती विहित केली होती. प्रारंभीच्या शासन निर्णयानुसार, उज्ज्वला योजनेअंतर्गत पात्र असलेले लाभार्थी या योजनेसाठी पात्र असणार आहेत.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेस पात्र असलेल्या लाभार्थींचे कुटुंब या योजनेस पात्र असणार आहे. एका कुटुंबात शिधापत्रिकेनुसार केवळएक लाभार्थी या योजनेस पात्र असेल. तसेच फक्त १४.२ किलोग्रॅम वजनाच्या गॅस सिलिंडरची जोडणी असलेल्या गॅस ग्राहकांना ही योजना लागू असेलअसे नमूद होते; परंतु त्यात नियमात बदल करण्यात आला असल्याने जिल्ह्यातील अनेक महिलांना या नव्या बदलाचा लाभ मिळणार आहे.

### काय झाला आहे बदल?

राज्य शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार, महिला व बालविकास विभागाकडून पात्र ठरविण्यात आलेल्या लाभार्थीपैकी १ जुलै २०२४ पर्यंत शिधापत्रिका नुसार कुटुंबातील इतर सदस्यांच्या नावे गॅस जोडणी असलेल्या महिला लाभार्थीनी स्वतःच्या नावे गॅस जोडणी हस्तांतर केल्यावर, त्या मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेस पात्र ठरतील. त्यामुळे आज रोजी ज्या महिलांच्या नावे गॅस कनेक्शन नाही, त्या आपल्या नावे गॅस कनेक्शन करून घेऊ शकतील.

# ज्येष्ठांनो घाबरू नका; ३१ पर्यंत करता येणार अर्ज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४ अमरावती**

राज्य शासनाने ज्येष्ठांसाठी वयोश्री योजना सुरू केली आहे. या योजनेच्या लाभासाठी अर्ज करण्यास ३ ऑक्टोबरपर्यंत मुदत देण्यात आली होती. मात्र, असंख्य ज्येष्ठांना या मुदतीत अर्ज करता आला नाही. त्यामुळे मुदतवाढ देण्याची मागणी होत होती. ही बाब लक्षात घेऊन शासनाने आता अर्जासाठी ३१ ऑक्टोबरपर्यंत मुदत वाढवून दिली आहे. ६५ वर्षावर अधिक वय असणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात सामान्य स्थितीत जगता यावे, वयोमानानुसार येणारे अपंगत्व, अशक्तपणा यावर उपायोजना करता याव्यात यासाठी आवश्यक



साहाय्यक साधने तसेच उपकरणे खरेदीसाठी मुख्यमंत्री वयोश्री योजनेच्या माध्यमातून मदत दिली जाते.

**ज्येष्ठांना दिलासा...**

मुख्यमंत्री वयोश्री योजनेसाठी अर्ज करण्याची मुदत ३ ऑक्टोबर रोजी संपली. यानंतरही अर्ज न केलेल्या ज्येष्ठांची संख्या मोठी होती. त्यामुळे अर्जासाठी मुदतवाढ देण्याची मागणी पुढे आली होती. अनेकांनी शासन स्तरावरही पाठपुरावा केला. त्यानुसार शासनाने ३१ ऑक्टोबरपर्यंत मुदत वाढविल्याने ज्येष्ठांना मोठा दिलासा मिळाला आहे.

**तीर्थदर्शन योजनेसाठी अनेक इच्छुक**

राज्य सरकारने मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना सुरू केली आहे. यासाठीही अनेक ज्येष्ठ नागरिक जाण्यासाठी इच्छुक आहे. या योजनेसाठी अकराशेवर नागरिकांनी अर्ज केले आहे. दरम्यान, आठशे नागरिकांची अर्ज मंजूर करण्यात आले.

# रेशन कार्डला मोबाइल लिंक केला का? धान्य वितरणाबाबतच्या अपडेट मिळण्यासाठी होणार सुलभ



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४ अमरावती**

सार्वजनिक वितरण प्रणालीअंतर्गत अंत्योदय, प्राधान्य कुटुंबातील पात्र शिधापत्रिकाधारकांना स्वस्त धान्याचे वितरण केले जाते. पात्र लाभार्थ्यांनाच धान्याचा लाभ मिळावा, यासाठी शिधापत्रिकेशी मोबाइल क्रमांक व आधार क्रमांक जोडण्याची प्रक्रिया केली जात आहे.

जिल्ह्यात पात्र शिधापत्रिकाधारकांना तांदूळ व गव्हाचे वितरण स्वस्त धान्य दुकानांमार्फत केले जात आहे. या लाभार्थ्यांनाच लाभ मिळावा. अन्य दुसरा व्यक्ती गरिबांच्या धान्यावर डल्ला मारु नये, यासाठी शिधापत्रिकांशी आधार क्रमांक संलग्न करण्यात आले होते. त्याबरोबरच संबंधित कुटुंबातील एक मोबाइल क्रमांक शिधापत्रिकेशी जोडाला जातो.यामुळे जेव्हा कुटुंबाला धान्याचे वितरण केले जाईल, तेव्हा त्याचा संदेश मोबाइल क्रमांकावर जावा, हा उद्देश आहे; परंतु जिल्ह्यात अद्याप अशी व्यवस्था सुरू झालेली नाही. ग्रामीण भागातील बहुतांश दुर्गम - कार्डधारकांनी रेशनकार्डला मोबाइल - लिंक केलेला नाही.

### मोबाइल क्रमांक जोडण्यासाठी काय कराल?

१ शिधापत्रिकेला मोबाइल क्रमांक जोडण्यासाठी संबंधित गावातील स्वस्त धान्य दुकानदारांशी संपर्क साधावा.

२ तहसील कार्यालयातील पुरवठा विभागाशी संपर्क साधून मोबाइल क्रमांक जोडणीसाठी अर्ज करावा.

### धान्य घेतले की येणार एसएमएस

एखाद्या कार्डधारकाने स्वस्त धान्याचा लाभ घेण्याकरिता मोबाइल ओटीपी सेवेचा लाभ घेतल्यास त्याच्या मोबा- इलवर धान्याची उचल केल्याचा संदेश येतो. त्यामुळे त्याला धान्याच्या उचलबद्दल सर्व माहिती प्राप्त होते.

### गैरव्यवहाराला बसणार चाप


सार्वजनिक वितरण प्रणालीअंतर्गत लाभार्थ्यांना मोफत धान्याचे वितरण केले जाते. ई-पॉस मशीनद्वारे रेशन कार्डधारकाच्या अंगठ्याचा ठसा घेऊन धान्य पुरविले जात असले, तरी तांत्रिक अडचणी आल्यास ओटीपीचा वापर करून धान्याची उचल करता येते. परंतु संबंधित लाभार्थ्यांचा मोबाइल क्रमांक शिधापत्रिकेशी संलग्न असणे आवश्यक आहे. शिधापत्रिकाधा- रकाला आधार कार्ड जोडणी, मोबाइल क्रमांक जोडणी आदी प्रक्रिया करावी लागते. या प्रक्रियेमुळे रेशन उचलल्यानंतर मोबाइलवर संदेश येतो.

# विदर्भाच्या राणीची उद्याला भावनिक विसर्जन यात्रा

## पंचदीप नवरात्र महोत्सव समितीचे आयोजन : विविध देखाव्यासह ठिकठिकाणी होणार मातेचे स्वागत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४ अमरावती**

नवरात्रीचे नऊ दिवस त्यांची अखंड सेवा करून भक्त मातेचा आशीर्वाद घेतात. याच सेवा कार्यात कार्यरत असताना पंचदीप नवरात्र महोत्सव समितीने विदर्भाच्या राणीची नित्य सेवा कार्यात स्वतःला झोकून दिले आहे. गेल्या ३१ वर्षांच्या या परंपरेला अनुसरून पंचदीप नवरात्र महोत्सव समिती आता मंगळवार, १५ ऑक्टोबर रोजी मातेला भावपूर्ण निरोप देत आहे. मातेची भक्तांच्या उपस्थितीत भव्य महाआरती झाल्यानंतर दुपारी ३ वाजता अंबागेट गांधी चौकातील मंडपातून देवीची विसर्जन यात्रेला सुरू होईल.पंचदीप नवरात्र महोत्सव समितीचे अध्यक्ष विनय भैय्या सिंगरे, उपाध्यक्ष अभिषेक पंजापी, सचिव



शिवानंद चौधरी, सहसचिव डॉ.सौरभ राठी, कार्याध्यक्ष डॉ.आशिष येवतीकर, स्वागताध्यक्ष राजेश साहू यांनी दिलेल्या माहिती अनुसार १५ ऑक्टोबर रोजी दुपारी ३ वाजता सुरू होणाऱ्या या भव्य विसर्जन यात्रेत विविध देखावे सादर करण्यात येणार आहेत. ज्यामध्ये मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्री राम, छत्रपती शिवाजी महाराज, विदर्भाची कुलस्वामिनी माता अंबादेवी आणि माता एकवीरा देवी यांच्या मूर्ती, लाईव हनुमान, महाकाल ग्रुपतर्फे सादरीकरणासह अग्नी आणि फटाक्यांची अतुलनीय आतीषबाजी होणार आहे. याशिवाय सुमारे ११ प्रकारच्या ढोल-पथकांचा समावेश असणार आहे.सायंकाळी ७.३० वाजता विदर्भाच्या राणीचे राजकमल चौकात आगमन होईल. शहरातील विविध मान्यवरांच्या हस्ते येथे महाआरती करण्यात येणार आहे. यानंतर ही विसर्जन मिरवणूक श्याम चौक, जयस्तंभ चौक, आदर्श हॉटेलसमोरून कॉटन मार्केट आणि मौसीकौलच्या दिशेने निघेल. या विसर्जन यात्रेत विविध ठिकाणी मातेचे भाविकांकडून स्वागत करण्यात येणार आहे. यासोबतच आरती झाल्यानंतर उपस्थित भाविकांमध्ये प्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. विदर्भाच्या कुलस्वामिनीची सेवा करण्याबरोबरच विदर्भाच्या राणीची सेवा करणाऱ्या पंचदीप नवरात्र महोत्सव समितीने विसर्जन यात्रेत सुरक्षेची विशेष व्यवस्था केली आहे. याशिवाय पोलीस प्रशासनानेही या यात्रेसाठी चोख बंदोबस्त तैनात केला आहे. येथेच नव्हे तर मातेच्या भक्तांची उपस्थिती लक्षात घेऊन भाविकांच्या सुरक्षेसाठी काही मार्गावरील वाहतुकीत बदल करण्यात आला आहे. त्यामुळे काही रस्ते वाहतुकीसाठी बंद करण्यात आले आहेत.या विसर्जन यात्रेत जास्तीत जास्त भाविकांनी सहभागी होऊन विदर्भाच्या राणीचे अंतिम दर्शन घेण्याचे आवाहन पंचदीप नवरात्रि महोत्सव समिति च्या वतीने करण्यात आले आहे.



# प्रविण पोटे पाटील यांच्या हस्ते विकास कामांचे भूमिपूजन संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४ अमरावती**

अमरावती महानगर पालिका प्रभाग क्रमांक १० अंतर्गत येणाऱ्या न्यू कॉलनी परिसरातील विकास कामांचे भाजपा अमरावती शहर अध्यक्ष मा. आ. प्रविण पोटे पाटील यांच्या हस्ते तसेच तुषारजी भारतीय यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. अमरावती शहराच्या विकासाकरिता नेहमीच कटीबद्ध असून येणाऱ्या काळात अमरावती शहराच्या प्रत्येक भागातील समस्यांचे निराकरण करणार असे प्रतिपादन मा. आ. प्रविण पोटे पाटील यांनी केले.यावेळी चेतन पवार, संध्याताई टिकले, कुणाल टिकले, अनिताताई राज, सौ पद्मजा कौडण्य, बलदेव बजाज, लखन राज, प्रविण कौडण्य व परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# कोंडेश्वर येथे विपश्यना भवन व ध्यानसाधना करीता मंजुर ३ कोटी रुपयाचा विकास कामाचे आ.रवि राणा यांच्या हस्ते भुमीपुजन संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**

शिका शिकवा संघटीत करा या भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार सरणीवर चालुन तळागळातील गोर-गरीबाची आ.रवि राणा सेवा करीत असतात. बडनेरा विधानसभा मतदार संघातील गावा-गावात व प्रभागा-प्रभागातील बुध्द विहार बांधण्याकरीता तसेच भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयाचे सौदर्यीकरणासाठी शेकडो कोटी रुपयांचा निधी शासनाकडुन मंजुर केला आहे व काम प्रगतीपथकावर आहे.

त्याच अनुषंगाने आ.रवि राणा यांनी मंजुर करून आणलेल्या कोंडेश्वर रोड येथे विपश्यना आणि ध्यान सांधना केंद्राच्या बांधकाम करीता ०३ कोटी रुपयाचा निधी मंजुर करुन आणला. नुकताच सुजनशील शैक्षणिक सामाजिक व सांस्कृतीक सेवा मंडळ,अमरावतीव्दारे आयोजीत विपश्यना व ध्यानसाधना केंद्राच्या पायाभरणी समारंभात आ.रवि राणा यांच्या हस्ते भुमीपुजन करण्यात आले. यावेळी आ.रवि राणा यांनी भगवान गौतम बुध्दाच्या मुर्तीकरीता आपल्या स्वत: आमदारकिच्या पगारातुन ०१ वर्षाचा पगार समर्पित केला. तसेच या संपूर्ण परीसराच्या सौदर्यीकरण करण्याकरीता व बांधकाम करण्याकरीता १०० कोटी रुपयांचा आराखडा सुध्दा तयार असल्याचे आ.रवि राणा यांनी यावेळी सांगीतले. यावेळी कोंडेश्वर रोड येथे भव्यदिव्य कार्यक्रम संपन्न - प्रा.डॉ.भिक्षु सम्यक बोधी, नागपुर यांची प्रमुख उपस्थिती तसेच सिध्दार्थ वानखडे, एस.डी.ओ अनिल भटकर , सुनिल वारे, यांच्यासह अनेक मान्यवर व समस्त बौध्द उपासक व उपासिका उपस्थित होते.

